नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५१ * अंक ६१ * * अमरावती * मंगळवार, दिनांक २ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## गंभीरपणे विचार करावा !

मुंबई शहर हे मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्राचे निर्माण होण्या पूर्वीपासून आंदोलनाचे शहर राहिले आहे. या शहरात दादाभाई नवरोजी काय, लोकमान्य टिळक काय, महात्मा गांधी गाय किंवा कॉ. डांगे यांच्यापासून जॉर्ज फर्नांडिस यांच्यापर्यंत प्रत्येकाची आंदोलन करण्याची एक वेगळी पद्धत होती. त्या काळात नेत्याने आवाहन केले की आंदोलक त्यांचा शब्द आणि आज्ञा प्रमाण मानत असत. मिल मजदूरांच्या बोनसच्या आंदोलनाचे दृश्य आणि वार्तांकन आम्ही केलेले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आचार्य अत्रे यांच्या शब्दात म्हटले तर, नरराक्षस मोरारजी देसाई यांनी चक्क गोळीबाराचा आदेश दिला होता. त्यामधील हुतात्म्यांचे आज हुतात्मा चौकात स्मारक शिवसेना सत्तेवर असताना उभे झालेले आहे. मुंबईत होणा?या आंदोलनाला एक दिशा असते त्यामुळे मुंबईची झालेली दशा आजपर्यंत दिसली नाही. आताचे आंदोलन वेगळ्या प्रकारचे आहे, केवळ समाजाच्या हितासाठी आपल्या जीवाची बाजी लावून मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत पदार्पण केले. कालपासून त्यांनी पाणीही बंद केले आहे. कारण जरांगे पाटील यांच्या मनात मराठा समाजाविषयी तळमळ आहे, म्हणूनच ते इतका आत्मक्लेश करून घेत आहेत. स्वतः या आंदोलनाचे सर्वोच्च नेते जरांगे पाटील हे केवळ हवेवर जगत आहे आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जरांगे पाटील यांच्या एका आवाहनामुळे मराठा समाजाचे जथ्थेच्या जथ्थे मुंबईत दाखल झालेले आहेत. आजच्या घडीला तरी या आंदोलकांना आंदोलनाची दिशा दाखवणारा सर्वमान्य नेता दुसरा कोणीही दिसत नाही,?त्यामुळे मुंबईची दशा होऊ नये म्हणूनच आंदोलकांना आणि त्यांच्या नेत्यांना संयम दाखवावा लागेल. बळजबरी करणे किंवा पोलीस कारवाई करणे या क्षणाला अशक्य आहे. यापुढेही दादा-बाबा करूनच हे आंदोलन थोपवावे लागणार आहे. आजच काही आंदोलकांनी शेअर बाजारकडे आपला मोर्चा वळवला होता पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असल्यामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही, पण त्यासाठी पोलिसांना किती आटापिटा करावा लागला असेल याची कल्पनाच केलेली बरी. जरांगे पाटील यांच्या मागण्या निश्चितपणे योग्यच आहेत असे म्हटले तरी त्याला कायद्यात बसवणे तितकेही सोपे नाही. आता तर आंदोलकांच्या अपेक्षांची वेल गगनापर्यंत गेलेली आहे, याला अनेक कंगोरे आहेत. आंदोलकांच्या अपेक्षा कितीही योग्य असल्या तरी सरकारला निश्चितपणे अनेक मर्यादा असतात. परस्पर विरोधी असलेल्या सरकारांनी एकमेकांवर आरोप करणे सोपे असते मात्र, प्रत्यक्षात सत्तेवर असणाऱ्यांची यामध्ये प्रचंड मोठी गोची होते. केवळ आपल्याच राज्यात असे प्रश्न नाहीत. तर देशातील अनेक मोठमोठे प्रश्न असेच अनुत्तरीत आहेत अगदी त्रिशंकू झालेले आहेत आणि लटकत पडलेले आहेत. सध्याच्या घडीला मराठा सेवक मनोज जरांगे पाटील यांचा जीव जास्त महत्त्वाचा आहे त्यांनी असिधारा व्रत स्वीकारलेले आहे. एक अत्यंत कमी वजन असणारा माणूस राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या किती वजनदार ठरू शकतो याचे उदाहरण म्हणजे जरांगे पाटील आहेत. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना कितीही दूषणे दिली तरी शेवटी त्यांनाच या प्रश्नाचा निकाल लावावा लागेल. हे सुद्धा आंदोलन करणाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे कारण अशा प्रकारच्या आंदोलनामध्ये सर्वांनाच प्रसन्न करणे शक्य नसते. थोडे तुम्ही पुढे या आणि आम्ही थोडेसे मागे जातो असे करावेच लागते. जरांगे पाटील यांना निश्चित असे आश्वासन देऊन हे आंदोलन लवकरात लवकर थांबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यात आता जास्त दिवस आणि वेळ न घालवता प्रत्येक तासा-तासांमध्ये तोडगा शोधणे हेच आता कौशल्याचे काम आहे. जरांगे पाटील यांना नक्कीच ठोस आश्वासन दिल्याशिवाय आंदोलनाच्या गाडीचा जो काही चक्काजाम झालेला आहे तो थांबेल असे दिसत नाही. सरकारने आणि मराठा आंदोलनाच्या नेत्यांनीही या सर्वांचा गंभीरपणे विचार करावा.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मुंबई मोकळी करा !

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

कोर्टाचे आदेश ■ आझाद मैदानावर ५ हजार आंदोलकच आंदोलन करू शकतील

मुंबईतल्या आझाद मैदानावर पाच हजार आंदोलकच आंदोलन करू शकतील. इतर मराठा आंदोलकांनी रस्ते आणि मुंबई मोकळी करावी, असे स्पष्ट आदेश सोमवारी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने दिले. शिवाय आता कोणालाही मुंबईत येऊ देऊ नका. मंगळवारी दुपारी ४ पर्यंत जिथे रस्ते अडवण्यात आले आहेत, त्या सर्व ठिकाणांवरच्या आंदोलकांना हटवा, असे आदेश न्यायालयाने दिले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे. तसेच संपूर्ण मुंबईत मोठ्या संख्येने राज्यभरातून मराठा समाज जमा झाला आहे. जरांगेंच्या या आंदोलनाविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणीत उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले.

मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयात मनोज जरांगे यांचा अर्ज वाचून दाखवला. या अर्जाच्या सुरुवातीलाच आमरण उपोषणाचा उल्लेख केला आहे. मात्र, आमरण उपोषणाला परवानगी नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारणा केली आहे. तसेच मनोज जरांगे यांना नोटीस बजावण्यात आली आहे का? असा सवालही मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केला आहे.



**डिप्लोमॅटीक वागू नका...**

आझाद मैदानात पाच हजार आंदोलकाव्यतिरिक्त इतर आंदोलक नको, असे आदेश कोर्टाने दिलेत. जरांगे यांनी लोकांना रस्ते अडवायला सांगितले नाही, असा युक्तिवाद आंदोलकांच्या वकिलांनी केला. मग रस्त्यावर फिरणाऱ्यांना आवाहन करून मुंबई बाहेर घालवणार का, असा सवाल कोर्टाने केला. तेव्हा वकिलांच्या वतीने आम्ही फक्त आवाहन करू शकतो, असे सांगण्यात आले. तेव्हा आमच्याशी डिप्लोमॅटीक वागू नका, असे खडेबोल कोर्टाने सुनावले.

माजी सैनिकांना केवळ आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. याउलट, राज्य सरकारची बाजू अशी होती की, आंदोलनाला केवळ एक दिवसासाठी परवानगी देण्यात आली होती आणि इतरत्र आंदोलन करण्यास परवानगी नव्हती. आंदोलकांनी सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याबाबत लेखी हमीपत्र दिल्यानंतरच त्यांना ही परवानगी देण्यात आली, अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिली.

न्यायालयाने नियमांचे पालन करून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती आणि त्याच आधारावर ही परवानगी देण्यात आली होती. आझाद मैदान आंदोलनांसाठी आरक्षित आहे, परंतु त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी आंदोलन करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने स्पष्ट केले.

पुढे आपली बाज मांडताना राज्य सरकारने म्हटले, गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणं पोलिसांसाठी देखील कठीण आहे. तरी आम्ही समतोल पाळण्याचा प्रयत्न करतोय जेणेकरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही.

शनिवारी आणि रविवारी आंदोलनाला परवानगी देण्यात आलेली नाही, केवळ ५ हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. तसेच जरांगे यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे देखील सरकारने वारंवार सांगितले आहे. शहर एक खेळाचे मैदान झाले असल्याचेही राज्य सरकारने म्हटले आहे.

गुणरत्न सदावर्ते यांनीही मुंबईतील मराठा आंदोलनाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

## अफगाणिस्तानात भूकंप
## ८०० हून अधिक ठार

२५०० जखमी





**■ वृत्तसंस्था, काबुल, दि. १ :**

रविवारी मध्यरात्री ११:४७ वाजता (स्थानिक वेळेनुसार) अफगाणिस्तानमध्ये ६ तीव्रतेचा भूकंप झाला. आतापर्यंत ८०० लोकांचा यात मृत्यू झाला आहे, तर २५०० हून अधिक लोक जखमी झालेत.

भूकंपाच्या वेळी बहुतेक लोक झोपले होते, त्यामुळे ते इमारतींच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. शहरात रात्रभर भूकंपाचे धक्के जाणवले. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की मृतांचा आकडा वाढू शकतो.

अमेरिकन भूगर्भीय सर्वेक्षणनुसार, भूकंप २ लाख लोकसंख्या असलेल्या जलालाबाद शहरापासून सुमारे १७ मैल अंतरावर झाला. ते राजधानी काबूलपासून १५० किमी अंतरावर आहे. न्यू यॉर्क टाइम्सच्या अहवालानुसार, बहुतेक मृत्यू शेजारच्या कुनार प्रांतात झाले आहेत. अल जझीराच्या वृत्तानुसार, भूकंपाचे धक्के पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा आणि पंजाब प्रांतातही जाणवले. त्याच वेळी, भारतातील गुरुग्राममध्येही सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले.

पंतप्रधान मोदींनी अफगाणिस्तानातील भूकंपाबद्दल शोक व्यक्त केला आहे. या कठीण काळात आमच्या संवेदना आणि प्रार्थना शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत आणि जखमी लवकर बरे व्हावे अशी आमची इच्छा आहे. भारत बाधितांना सर्वतोपरी मानवतावादी मदत आणि मदत पुरवण्यास तयार आहे.

**भूकंपानंतर भूस्खलनामुळे रस्ते बंद**

न्यूयॉर्क टाइम्सच्या अहवालानुसार, बहुतेक मृत्यू शेजारच्या कुनार प्रांतात झाले आहेत. सरकारी प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी सोशल मीडियावर लिहिले की, भूकंपामुळे देशाच्या काही पूर्वेकडील प्रांतांमध्ये गंभीर जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. हा डोंगराळ भाग आहे. या भागात पोहोचणे खूप कठीण आहे, ज्यामुळे बचाव आणि मदत कार्यात अडचणी येत आहेत. या भागातील लोकांना बाहेर काढण्यासाठी सरकार हेलिकॉप्टरचा वापर करत आहे.

## न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे हे प्रशासनाचे कर्तव्य : फडणवीस

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :**



न्यायालयाने दिलेल्या आदेशाच पालन करणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. बैठकीत आम्ही सगळ्या पर्यायांचा विचार केला तसेच या बाबी कोर्टात कशी टिकेल यावर चर्चा करण्यात आली, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महिला पत्रकारांचा विनयभंग हे कुठेतरी गालबोट असल्यासारखे आहे. महिला पत्रकार त्यांचे काम करत असतात आणि त्यांच्या भावना पोहोचवण्याचे काम करत असतात. हे अतिशय निंदनीय असल्याचे ते म्हणाले.

राजकीय पोळी भाजणे बंद केले पाहिजे, असे म्हणत फडणवीस यांनी सुप्रिया सुळे यांना टोला लगावला. त्यांची सत्ता असताना त्यांनी मराठा समाजासाठी का काही केले नाही? जे काही केले ते मी आणि एकनाथ शिंदे यांनी केले आहे, याचा पुनरूच्चार त्यांनी यावेळी बोलताना केला.

## हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा मसुदा तयार

मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीनंतर विखे पाटलांची माहिती

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून अवघ्या राज्याचे राजकारण तापले असताना राज्य सरकार हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या मुद्यावर सकारात्मक असल्याची माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या मुद्यावर सकारात्मक आहे. यासंबंधीचा एक मसुदाही तयार करण्यात आला आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे पाटलांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी गत शुक्रवारपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा चौथा दिवस आहे. त्यांची प्रकृती काहीशी बिघडण्याची चिन्हे असताना सरकारच्या वतुर्ळात त्यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

आज या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात एक बैठक झाली. या बैठकीला एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह सर्वच प्रमुख नेते व अधिकारी उपस्थित होते.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मराठा आंदोलनाच्या मुद्यावर आज बैठक झाली. त्यात हैदराबाद गॅझेट कायद्याच्या मुद्यावर कायद्याच्या चौकटीत राहून काय तोडगा काढता येईल यावर सविस्तर चर्चा झाली.

## ओबीसी प्रवर्गात आम्हाला दुसरे वाटेकरी नको..

**■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. १ :**

आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही देखील लाखोंच्या लोंढ्यासह मुंबईत दाखल होणार आणि आम्हाला कोणीही रोखू शकणार नाही, असा इशारा छगन भुजबळ यांनी दिला आहे. तसेच ओबीसी प्रवर्गात अजून कोणत्याही जातीला आणू नका, असेही त्यांनी पत्रकार परिषदेतून म्हटले आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाज मागास नाही हे सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. तसेच मराठा-कुणबी एकच मानणे हे सामाजिक मूर्खपणाचे असेही कोर्टाने म्हटले. जे शेतकरी आहेत ते कुणबी आहेत असे ते म्हणतात, ब्राह्मणांची सुद्धा शेती आहे, सगळ्याच समाजाच्या शेती आहेत, त्यांना कुणबी म्हणायचे का? असा वाल त्यांनी केला.



## भूस्खलनात चौघांचा मृत्यू

**■ वृत्तसंस्था, शिमला, दि. १ :**

देशातील बहुतेक भागात मान्सूनचा पाऊस तीव्र झाला आहे. पंजाब, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. शिमला येथील कोटखाई, जुब्बल आणि जंगा येथे रात्री उशिरा झालेल्या भूस्खलनात ४ जणांचा मृत्यू झाला आहे.

सोमवारी हिमाचलमधील कुल्लूसह १० जिल्ह्यांमध्ये शाळा आणि महाविद्यालये बंद आहेत. चंदीगड-मनाली चार पदरीसह ४ राष्ट्रीय महामार्ग आणि ८०० हून अधिक रस्ते बंद आहेत. सिरमौर जिल्ह्यातील दादाहू येथे गिरी नदी दुथडी भरून वाहत आहे. लोकांना घरे रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जम्मू-काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील बुधल येथील गुंडी भागात भूस्खलनामुळे सुमारे १२ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. रियासी जिल्ह्यात अचानक आलेल्या पुरात एक आई आणि मुलगा वाहून गेले. दोडा जिल्ह्यातील असार येथे चिनाब नदीत अचानक आलेल्या पुरात आठ जण वाहून गेले. तथापि, सर्वांना वाचवण्यात आले. गेल्या १५ दिवसांत जम्मू आणि काश्मीरमधील चार जिल्ह्यांमध्ये ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत.

## लिव्ह-इन पार्टनरला बंगळुरूत जिवंत जाळले

**■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. १ :**



कर्नाटकातील बंगळुरूमध्ये एका लिव्ह-इन पार्टनरला जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने प्रथम कारमधून जाणाऱ्या लिव्ह-इन पार्टनरचा पाठलाग केला. नंतर सिग्नलवर गाडी थांबवत पेट्रोल ओतले.

गाडीत एकूण तीन जण होते. जेव्हा ती महिला गाडीतून बाहेर पडली तेव्हा आरोपीने तिचा पाठलाग केला. त्याने तिच्यावर जास्त पेट्रोल ओतले आणि लायटरने तिला पेटवून दिले. ती महिला ६० टक्के भाजली होती. रुग्णालयात उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी सांगितले की, आरोपीची ओळख ५० वर्षीय विठ्ठल अशी झाली आहे. तो कॅब ड्रायव्हर होता आणि जास्त मद्यपान करत होता. मृत महिलेचे नाव वनजाक्षी होते. ती ३५ वर्षांची होती. दोघेही चार वर्षांपूर्वी लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये होते.

विठ्ठलचे यापूर्वी तीन लग्न झाले होते. वनजाक्षीनेही लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये येण्यापूर्वी दोनदा लग्न केले होते. विठ्ठलच्या दारूच्या व्यसनाला आणि वारंवार होणाऱ्या छळाला कंटाळून ती वेगळी झाली होती. घटनेच्या दिवशी, विठ्ठल वनजाक्षीच्या गाडीचा पाठलाग करत होता. एका ट्रॅफिक सिग्नलवर, विठ्ठलने गाडी थांबवली आणि वनजाक्षी, मरियाप्पा आणि ड्रायव्हरवर पेट्रोल ओतले. मरियाप्पा आणि ड्रायव्हर तिथून पळून गेले, पण विठ्ठलने वनजाक्षीचा पाठलाग केला. पळून जाताना वनजाक्षी खाली पडली तेव्हा विठ्ठलने तिच्यावर जास्त पेट्रोल ओतले आणि लायटरने तिला पेटवून दिले.

## आम्ही हायड्रोजन बॉम्बसह तयार

राहुल गांधीचे विधान

**■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. १ :**



बिहारमध्ये १६ दिवस चाललेली राहुल गांधींची मतदार हक्क यात्रा आज म्हणजेच सोमवारी पाटणा येथे संपली. राहुल गांधी यांनी पाटण्यात साडेतीन तास मतदार हक्क यात्रा काढली. सकाळी ११ वाजता गांधी मैदानावरील महात्मा गांधींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून यात्रेला सुरुवात झाली आणि उच्च न्यायालयाजवळील आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्याचा समारोप झाला.

याआधी, राहुल, तेजस्वी यांचा मोर्चा डाकबंगला क्रॉसिंगवर थांबवण्यात आला. येथे एक जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. आपल्या भाषणात राहुल गांधी म्हणाले, 'एनडीएचे लोक मते चोरून जिंकत आहेत. महाराष्ट्रातही ते मते चोरून जिंकले. देशातच नाही तर चीनमध्येही लोक म्हणत आहेत, वोट चोर, गद्दी छोड.' 'मतदार हक्क यात्रेत भाजपचे लोक काळे झेंडे दाखवत आहेत. भाजपच्या लोकांनी ऐकावे, हायड्रोजन बॉम्ब हा अणुबॉम्बपेक्षा मोठा आहे, तो येत आहे. मत चोरीचे सत्य संपूर्ण देशाला कळणार आहे. हायड्रोजन बॉम्बनंतर नरेंद्र मोदी देशाला तोंड दाखवू शकणार नाहीत.'

राहुल गांधी यांचे भाषण संपताच काही तरुणांनी काळे झेंडे फडकवण्यास सुरुवात केली. त्यानंतर गोंधळ सुरू झाला. पोलिसांनी कसेबसे दोन तरुणांना तेथून बाहेर काढले. दोघांनाही पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. दोघांचीही चौकशी सुरू आहे. दरम्यान, राहुल गांधी दिल्लीला रवाना झाले आहेत. यापूर्वी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दावा केला की मोदी सरकार ६ महिन्यांत पडेल.

## काश्मीरच्या पूंछमध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला

**■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १ :**

भारतीय सैन्याने सोमवारी काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातील मेंढर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) दहशतवाद्यांचा घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला.

लष्कराच्या युनिट व्हाईट नाईट कॉर्प्सने सांगितले की, सकाळी ५:३० वाजता बालाकोटच्या सामान्य भागात नियंत्रण रेषेजवळ संशयास्पद हालचाली दिसून आल्या.

घुसखोरीचा प्रयत्न थांबवण्यासाठी जवानांनी ताबडतोब गोळीबार सुरू केला. त्यानंतर दहशतवाद्यांनीही अंदाधुंद गोळीबार सुरू केला. यानंतर दहशतवाद्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे. लष्कराने सांगितले की, दहशतवादी पाकव्याप्त काश्मीरमधून देशात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते.

## गुरूजींना नोकरीत टिकून राहण्यासाठी टीईटी आवश्यक

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश : अन्यथा राजीनामा किंवा निवृत्ती घ्यावी लागेल

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १ :**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवार १ सप्टेंबर रोजी निर्देश दिले आहेत की आता अध्यापन सेवेशी संबंधित सर्व शिक्षकांना त्यांच्या सेवेत राहण्यासाठी किंवा पदोन्नती मिळविण्यासाठी शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी उत्तीर्ण करावी लागेल.

न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तथापि, ज्या शिक्षकांच्या सेवेत फक्त ५ वर्षे शिल्लक आहेत त्यांना खंडपीठाने दिलासा दिला आहे.

खंडपीठाच्या निर्देशानुसार, ज्या शिक्षकांना ५ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवेत राहावे लागते त्यांना सेवेत राहण्यासाठी टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जर त्यांनी तसे केले नाही तर त्यांना राजीनामा द्यावा लागेल किंवा सक्तीची निवृत्ती घ्यावी लागेल.

हे निर्देश अल्पसंख्याक संस्थांना लागू होतील की नाही हे मोठे खंडपीठ ठरवेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. तामिळनाडू आणि महाराष्ट्रात अध्यापनासाठी अनिवार्य टीईटीशी संबंधित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा निर्णय दिला.

**टीईटी परीक्षा म्हणजे काय?**

शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी ही राष्ट्रीय स्तरावरील पात्रता परीक्षा आहे जी उमेदवार प्राथमिक आणि उच्च प्राथमिक वर्गात (इयत्ता १ ते ८) शिक्षक होण्यास पात्र आहे की नाही हे ठरवते. ही परीक्षा २०१० मध्ये राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) अनिवार्य केली होती.

शिक्षण हक्क कायदा, २००९ च्या कलम २३(१) नुसार, शिक्षकांसाठी किमान पात्रता एनसीटीई द्वारे विहित केली जाईल. एनसीटीईने २३ ऑगस्ट २०१० रोजी एक अधिसूचना जारी केली ज्यामध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिक्षक होण्यासाठी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य केले गेले.

एनसीटीईने शिक्षक पदांवर नियुक्त झालेल्या उमेदवारांना टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी ५ वर्षांचा कालावधी दिला होता. नंतर हा कालावधी आणखी ४ वर्षांनी वाढवण्यात आला.

एनसीटीईच्या सूचनेविरुद्ध उमेदवारांनी न्यायालयात धाव घेतली. मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने जून २०२५ मध्ये सांगितले की २९ जुलै २०११ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना सेवेत राहण्यासाठी टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक नाही, परंतु पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

या निर्णयाच्या आधारे, सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करताना आता हा निर्णय दिला आहे.

# किरीट सोमय्या यांच्यावर हल्ला



**छत्रपती संभाजीनगर :** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांच्यावर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे हल्ला झाला आहे. त्यांनी स्वतःच एका ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे. या हल्ल्यात नेमक्या कोणत्या प्रकारचे नुकसान झाले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे अवघ्या राज्याचे राजकारण तापले असताना ही घटना घडल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. किरीट सोमय्या आज सकाळी सिल्लोड पोलिस व तहसीलदारांकडे 1100 बोगस जन्म प्रमाणपत्रांच्या फसवणुकीचे पुरावे सादर करण्यासाठी गेले होते. तिथे त्यांच्यावर व त्यांच्या गाडीवर हल्ला झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या घटनेची एका ट्विटद्वारे त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथील उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयाबाहेर माझ्यावर व माझ्या गाडीवर हल्ला करण्यात आला. हा हल्ला मुस्लिम अतिरेक्यांनी केला. पण सीआयएसएफ सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना हाकलून लावले. त्यानंतर मी सिल्लोड पोलिस व एसडीओ तहसीलदार यांच्याकडे 1100 बोगस जन्म प्रमाणपत्रांच्या फसवणुकीचे पुरावे सादर केले. महाराष्ट्रात जन्म प्रमाणपत्र मिळवणाऱ्या 2.24 लाख अपात्र, घुसखोर, बेकायदेशीर व्यक्तींविरोधातील माझा लढा सुरूच राहील.

# आंदोलक हे काही आरोपी नाहीत

## आमरण उपोषणाचे निवेदन आधीच दिले होते, मनोज जरांगेंच्या वकिलांचा युक्तिवाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**



आज पर्यंत मनोज जरांगे यांनी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे त्यांचे वकील श्रीराम पिंगळे यांनी म्हटले आहे. जरांगे यांनी आमरण उपोषणाचे निवेदन आधीच दिले होते. आंदोलक हे काही आरोपी नाहीत, असेही त्यांनी म्हटले आहे. सरकारने अन्न, पाणी आणि वीज दिलेच पाहिजे. जरांगे यांचे आंदोलन हे सरकारच्या विरोधात आहे, जनतेला कुठलाही त्रास देण्याचा हेतु नाही, असे पिंगळे म्हणाले.

मुंबई उच्च न्यायालयात आज मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर सुनावणी झाली, त्यानंतर वकील पिंगळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, मनोज जरांगे यांनी यापूर्वी 7-8 वेळा आंदोलन सोडले आहे. मुंबईत मराठा आंदोलक कोणालाही त्रास देत नाहीत. जे काही झाले असेल ते ॲक्शनला रिएक्शन आहे. मराठा आंदोलकांची संख्या मुंबईत वाढत असून अन्न-पाण्याची सोय करण्यात यावी. तसेच मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य केल्या असत्या तर ही वेळ आलीच नसती. मराठा आंदोलकांकडून महिला पत्रकारांना त्रास दिला जात असल्याचा आरोप केला जात आहे. यावर स्पष्टीकरण देताना पिंगळे म्हणाले, मनोज जरांगे यांनी काल भाषणात आदेश दिले आहेत की ते जे कोणी असतील त्यांच्या कानाखाली मारा. परंतु, महिलांना त्रास देण्याची आमची संस्कृती नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी चालणारे मराठे आहोत. त्यामुळे असे काही होणार नाही आणि तुम्ही देखील चुकीच्या बातम्या लाऊ नये, अशी विनंती पिंगळे यांनी केली आहे.

पुढे बोलताना वकील श्रीराम पिंगळे म्हणाले, खाण्याची दुकाने आमच्यासाठी बंद ठेवण्यात आली होती. सार्वजनिक शौचालय बंद होती.

त्यामुळेच आंदोलकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. तसेच न्यायालयाने आता आणखी मराठा आंदोलकांना मुंबईत येऊ देऊ नका असे निर्देश दिले आहेत. आंदोलनकर्त्यांना मुंबईत आणणार नाही याची देखील जरांगे यांना विनंती करतील, अशी भूमिका पिंगळे यांनी घेतली आहे.

# फोटो व्हायरल करण्याची धमकी २ लाख रुपये उकळले

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १ :**

जीवनसाथी मॅट्रिमोनी या सोशल मिडियावरील विवाह विषयक संकेतस्थळावरुन झालेल्या ओळखीतून एका ३३ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. सदर शारिरिक संबंधाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर प्रसारित करण्याची धमकी देऊन महिलेकडून दोन लाख रुपये उकळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी आरोपी विरुद्ध खराडी पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमित गंगाधर शेंडगे (रा. पारगाव, जि. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पिडित महिलेने खराडी पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि आरोपी शेंडगे यांची मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात जीवनसाथी मेट्रोमिनी या विवाह विषयक संकेतस्थळावरुन ओळख झाली होती. शेंडगेने महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तो महिलेला भेटण्यासाठी सोलापूर येथून पुण्यात आला. एका हॉटेलमध्ये महिलेला नेऊन त्याने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला, तसेच तिचे आक्षेपार्ह फोटो, व्हिडिओ त्याने मोबाइलवर काढले. त्यानंतर शेंडगेने महिलेला ब्लॅकमेलिंग करत धमकावण्यास सुरुवात केली. हॉटेलमध्ये काढलेले आक्षेपार्ह फोटो महिलेचे नातेवाईक आणि सोशल मिडियावर प्रसारित करण्याची धमकी देऊन तिच्याकडून दोन लाख रुपये घेतले. दरम्यान, आरोपीला महिलेने विवाहाबाबत विचारणा केली. त्यावेळी त्याने लग्नाची विचारणा केल्यास विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याची धमकी तिला दिली. त्याच्या धमकीमुळे घाबरलेल्या महिलेने याबाबत खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. बलात्कार, तसेच माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.महिला पोलीस उपनिरीक्षक मोनाली भदे पुढील तपास करत आहेत.

### मराठा आंदोलकांकडून सुप्रिया सुळेंच्या गाडीवर हल्ला

# सुषमा अंधारेंनी साधला महायुतीवर निशाणा



**पुणे :** मुंबई येथील मनोज जरांगे यांचे मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी पुन्हा एकदा उपोषण सुरू झाले असून आजचा तिसरा दिवस आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज आझाद मैदानावर जाऊन जरांगेंची भेट घेतली. तसेच तिथून निघत असताना मराठा आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांना घेरा घालण्याचा प्रयत्न केला. सुप्रिया सुळे गाडीत बसल्यावर त्यांच्या गाडीवर पण्याच्या बॉटल फेकल्याची घटना घडली. यावरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया देत महायुती सरकारवर टीका केली आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, सुप्रिया सुळे मराठा आंदोलकांना भेटण्यासाठी गेल्या असता काही लोकांनी त्यांना घेराव घातल्याची बातमी मोठी करून दाखवली जात आहे. ब्रेकिंग न्यूज च्या नावाखाली "पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले" अशी ही एक बातमी दाखवली जात आहे. खरंतर मी पवारांची अनेक वर्ष टीकाकार राहिले आहे. मात्र पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले हे काही पटण्यासारखे नाही. महाराष्ट्रात संस्थात्मक काम उभा करण्यामध्ये पवारांचे योगदान कोणीही नाकारू शकत नाही. सहकार क्षेत्राचे कार्य जाळे पवारामुळेच महाराष्ट्रात गावा खेड्या पर्यंत पोहोचू शकले.

# मुंबईत मराठा आंदोलनाचा ज्वालामुखी

## शेअर मार्केटमध्ये घुसण्याचा आंदोलकांचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

मुंबईत सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या लढ्याने सोमवारी थरारक वळण घेतले. पहाटेपासूनच आंदोलकांनी वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलनाची नवी रूपे धारण केली. काही आंदोलकांनी अचानक शेअर बाजारात घुसण्याचा प्रयत्न केल्याने बीएसई इमारतीबाहेर क्षणभर गोंधळ उडाला. सुरक्षा रक्षकांनी योग्य वेळी त्यांना रोखत परिसर रिकामा केला.

दरम्यान, सीएसएमटी परिसरात आंदोलकांनी मुंडन आंदोलन करत हुतात्मा चौकाकडे जाणारा रस्ता अडवला. परिणामी रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. सीएसएमटीजवळील बेस्ट बससेवा पूर्णपणे ठप्प झाली तर फॅशन स्ट्रीट परिसरात गाड्या अडवल्याने गोंधळ आणि अस्वच्छतेचा प्रश्न उभा राहिला. मंत्रालयासमोर ठिय्या देत घोषणाबाजी करणाऱ्या आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला.

विशेष म्हणजे आंदोलकांनी रस्त्यावर बसून चटणी-भाकरी खाऊन घोषणाबाजी करत आंदोलनाचा निर्धार दाखवला. मंत्रालय परिसरासह सीएसएमटी, फॅशन स्ट्रीट आणि बीएसई या सर्व ठिकाणी पोलिस व आंदोलक आमने-सामने आलेले चित्र सकाळपासून पाहायला मिळाले.

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाचा हा चौथा दिवस असून, आंदोलनाची तीव्रता प्रत्येक दिवशी वाढताना दिसत आहे. देशाची आर्थिक राजधानीत ठिकठिकाणी उभारलेल्या आंदोलकांच्या निदर्शनामुळे मुंबईकर त्रस्त झाले आहेत. मात्र, आंदोलन मागे घेण्याची कोणतीही चिन्हे नसल्याने पुढील काही तासांत परिस्थिती अजून तणावपूर्ण होण्याची शक्यता आहे. हे आंदोलन नेमक्या कोणत्या टप्प्यावर जाईल आणि प्रशासनाला झुकावे लागेल का, याकडे सर्वांचे डोळे खिळले आहेत.

# मराठा आंदोलकांना वानखेडे स्टेडियम द्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**



राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना आझाद मैदानाऐवजी वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. मराठा आंदोलकांसाठी आझाद मैदान अपुरे पडत आहे. त्यामुळे त्यांना वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून द्यावे, असे मनसेने म्हटले आहे. यावेळी मनसेने मनोज जरांगे यांनी राज ठाकरेंवर केलेली टीकाही फेटाळून लावली.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनी आज मनसैनिकांना मराठा बांधवांना सर्वोतपरी मदत करण्याचे आवाहन केले. त्यानंतर मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे स्वरुप पाहता आंदोलकांना आझाद मैदानाऐवजी वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून देण्याची मागणी केली. ते म्हणाले, सरकारने मराठा आंदोलनावर लवकरात लवकर तोडगा काढावा. आंदोलकांसाठी आझाद मैदानाची जागा कमी पडत आहे. मराठा बांधवांची इतरत्र व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाने त्यांना मुंबईतील वानखेडे स्टेडियम उपलब्ध करून द्यावे. असे झाले तर त्यांना एकाच ठिकाणी हवी तेवढी जागा मिळेल.

राज ठाकरे यांचा स्वभाव सर्वांना माहिती आहे. ते स्पष्ट बोलतात. त्यांच्या पोटात एक आणि ओठात एक असे नसते. आज अमित ठाकरे यांनीही मनसैनिकांना मराठा बांधवांना सर्वोतपरी मदत करण्याची सूचना केली. हे लोक आपले आहेत. त्यांचा लढा सुरू आहे. त्यांना मदत करा. त्यांना काहीही कमी पडू देऊ नका असे ते म्हणालेत. तशा सूचना आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना केल्या आहेत. माझी मनोज जरांगे पाटील व मुंबईत आलेल्या आंदोलकांना विनंती आहे की, त्यांनी कायदा व सुव्यवस्था बिघडवू देऊ नये. त्यांनी या प्रकरणी योग्य ते नियोजन करावे.

गणेशोत्सवाच्या काळात कुणालाही कोणतीही अडचण होऊ नये हा विचार त्यांनी करावा. सरकार या प्रकरणी काही कमी पडतेय का? यावर बोलणे योग्य ठरणार नाही. गणेशोत्सवाच्या काळात काही ताण असतो, पण सरकार कमी पडत असे नाही.

# रस्ते अडवल्याने आरक्षण मिळत नाही

## विखे पाटलांनी आंदोलकांना सुनावले



**मुंबई :** मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी पहिल्यांदाच मुंबईत रस्ते कथितपणे रस्ते जाम करणाऱ्या मराठा आंदोलकांना कडक शब्दांत समज दिली आहे. रस्ते अडवल्याने किंवा रिझर्व्ह बँकेच्या समोर जाऊन घोषणाबाजी केल्याने आरक्षण मिळत नाही. सरकारने घेतलेला निर्णय कोर्टात टिकावा असा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे या प्रकरणी वेळ लागत आहे, असे ते म्हणालेत. मनोज जरांगे पाटलांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी गत शुक्रवारपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या मराठा आंदोलकांनी आज रिझर्व्ह बँकेपुढे जाऊन घोषणाबाजी केली. तसेच काही आंदोलकांनी शेअर बाजाराच्या इमारतीतही शिरण्याचा प्रयत्न केला. विशेषतः काही आंदोलकांनी मुंबईतील काही प्रमुख रस्त्यांवर गाड्या आडव्या लावल्या आहेत. यामुळे रहदारीचा प्रश्न उपस्थित झाला असताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आंदोलकांना खडेबोल सुनावलेत. समाजाला गालबोट लागेल असे कोणतेही कृत्य आंदोलकांनी करू नये, असे ते म्हणालेत.

### सिमेंट बल्कर ट्रकची दुचाकीला धडक

# दोन तरुणांचा मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १ :**

पुणे शहरातील कात्रज - सासवड बाह्यवळण मार्गावर हांडेवाडी चौक ते मंतरवाडी चौक या दिशेने येणाऱ्या मार्गिकेवर शेल पेट्रोल पंपच्या शेजारील रस्त्यावरुन दुचाकीवर दोन जण जात होते. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या सिमेंट बलकर ट्रकने दिलेल्या धडकेत दोघेजण ट्रकखाली चिरडून त्यांचा दुर्देवी मृत्यू झाल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी आरोपी ट्रकचालकास पोलिसांनी अटक केली आहे.

संतोष प्रल्हाद कांबळे (वय-३९,रा. कवडगाव, अहमदनगर) व सुर्दशन गोरख पुलावळे (वय-३८,रा. उरळी देवाची,पुणे) अशी मयत झालेल्या दोघांची नावे आहे. याप्रकरणी ट्रकचालक नागेश नाना कोरके (वय- ३०,रा. उपळाई बुद्रुक, ता.माढा, सोलापूर) या आरोपीस अटक करण्यात आली आहे. पोलिस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी सांगितले की, संतोष कांबळे व सुर्दशन पुलावळे हे दोघे मोटरसायकल क्रमांक एमएच १२ ईयु १८३० यावरुन हांडेवाडी ते मंतरवाडी चौका दरम्यान सोमवारी सकाळी जात होते.

त्यावेळी सिमेंट बलकर (यात केवळ सुट्टे सिमेंट असते) या ट्रकने संबंधित दुचाकीस भीषण धडक दिली. यामध्ये सदर दोघे ट्रक खाली आल्याने त्यांचा दुर्देवीरित्या मृत्यू झाला आहे. पोलिसांनी आरोपी ट्रकचालक नागेश कोरके याला ताब्यात घेतले आहे. घटनेनंतर मृतांची ओळख पटविण्यात आली.

# विद्युत सहायकपदाच्या उमेदवारांना मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

महावितरणमध्ये विद्युत सहायकपदी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला पूर्ण झाली आहे. तथापि राज्यातील अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच इतर कारणांमुळे गैरहजर असलेल्या काही उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दि. ९ व १० सप्टेंबरला शेवटची संधी देण्यात आली आहे. महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेले उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात आली आहे. मात्र या तीनही दिवसांत राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थिती तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे निवड झालेल्या ज्या उमेदवारांना उपस्थित राहता आले नाही, अशा काही गैरहजर उमेदवारांना मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे. त्यानुसार आता दि. ९ व १० सप्टेंबरला गैरहजर उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे, प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता ही कार्यवाही सुरू होईल. त्यासाठी संबंधित उमेदवारांनी स्वतः सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार आणखी एक संधी देऊनही कागदपत्रांच्या पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## आंदोलक हे काही आरोपी नाहीत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

आज पर्यंत मनोज जरांगे यांनी कोर्टाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे त्यांचे वकील श्रीराम पिंगळे यांनी म्हटले आहे. जरांगे यांनी आमरण उपोषणाचे निवेदन आधीच दिले होते. आंदोलक हे काही आरोपी नाहीत, असेही त्यांनी म्हटले आहे. सरकारने अन्न, पाणी आणि वीज दिलेच पाहिजे. जरांगे यांचे आंदोलन हे सरकारच्या विरोधात आहे, जनतेला कुठलाही त्रास देण्याचा हेतु नाही, असे पिंगळे म्हणाले. मुंबई उच्च न्यायालयात आज मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर सुनावणी झाली, त्यानंतर वकील पिंगळे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# कोल्हापूर जिल्ह्यात मराठा आंदोलनाला पाठबळ

**कोल्हापूर :** मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी कोल्हापुरातून पाठबळ देण्याचा निर्णय घेण्यात आला. तर या मागणीसाठी गावोगावी आंदोलने होत आहेत. रांगोळी (ता. हातकणंगले) येथेही उपोषण करण्यात येत आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील उपोषणाच्या पार्श्वभूमीवर आज येथे सकल मराठा समाजाची बैठक होऊन आंदोलनाला मोठ्या प्रमाणात रसद पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला. कोल्हापूर येथून किमान एक ट्रक जीवनावश्यक वस्तू येत्या दोन दिवसांत पाठवले जाणार आहे. वसंतराव मुळीक, चंद्रकांत पाटील, उमेश पवार, रुपेश पाटील, राजू सावंत, संदीप देसाई, शाहीर दिलीप सावंत, राहुल इंगवले, बाबा महाडिक, शैलजा भोसले, सुनीता पाटील, सुधा शिंदे, गीता हसुरकर, बबिता जाधव, नीलेश चव्हाण, अनिल घाटगे, उदय लाड उपस्थित होते. मुंबई येथील मराठा आरक्षणासाठी होत असलेल्या आंदोलनास रांगोळी ग्रामस्थांचा पाठिंबा मिळत आहे. आज लाक्षणिक उपोषणस्थळी पाठिंबा दर्शवण्यात आला. छत्रपती शिवाजी मार्केट माळभाग येथे झालेल्या उपोषणात मराठा, लिंगायत, जैन, बौद्ध, मातंग, कुंभार, मुस्लिम समाजाचाही पाठिंबा मिळत आहे. पिंटू देसाई, सुनील काटकर, प्रवीण शेट्टी, बापुसो मुलानी, विजय माने, कुबेर कांबळे आदी या उपोषणात सहभागी झाले होते.

### महिला वाहतूक पोलिसाला मोटारीने ठोकले

**पिंपरी :** चाकण येथे वाहतूक नियमन करणाऱ्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्याला मोटारचालकाने धडक देऊन पळ काढला. वाहनावर थकीत असलेला दंड भरण्यास सांगितल्याने चालकाने वाहतूक पोलिसांना शिवीगाळ करून धमकी दिली. देवयानी सोनवणे असे जखमी पोलीस महिलेचे नाव आहे.

# मराठा आंदोलकांसाठी जेवण घेऊन जाणारी वाहने पोलिसांनी रोखली

■ **महासागर प्रतिनिधी ठाणे, दि. १ :**



मुंबईत मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांसाठी जेवण घेऊन निघालेल्या वाहनांना ठाणे आणि मुंबई शहराच्या वेशीवर असलेल्या आनंदनगर नाका येथे पोलिसांनी अडविली. यामुळे मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करत घोषणाबाजी सुरू केल्याने परिसरात तणावाचे वातावरण होते. मराठा आंदोलकांनी हा अन्यायकारक प्रकार असल्याचे सांगत या घटनेचे निषेध नोदवून घोषणाबाजी सुरू केली आणि त्यानंतर पोलिसांनी ही वाहने सोडली.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी राज्यभरातून मराठा बांधव मुंबईत मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहेत. यात मराठवाडा आणि विदर्भ मधील मराठा आंदोलकांचा सहभाग सर्वात जास्त आहे. या भागातील मराठा बांधव हे ठाण्याच्या माजीवडा मानपाडा आणि विटावा या भागात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे.

या भागातील घराघरातून आंदोलकांसाठी चटणी, भाजी, भाकर देण्यात येत आहे. हे जेवण घराघरातून गोळा करून ते वाहनाने मुंबईतील आंदोलकांपर्यंत पोहचविण्याचे काम मराठा समाजाचे कार्यकर्ते करत आहेत. कल्याणमधील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी शनिवारपासून मुंबईत अन्नछत्र सुरू केले आहे.

कल्याणच्या बाजारातून भाजीपाला तसेच इतर साहित्य मुंबईत सकाळी नेण्यात येते आणि तिथेच जेवण बनवून मराठा आंदोलकांना देण्यात येत आहे. पावसामुळे अन्नछत्रसाठी मुंबई तात्पुरती शेड उभारण्यात आली आहे. ठाणे शहराच्या वागळे इस्टेट परिसरात कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. या भागातून मुंबईतील मराठा आंदोलकांना फळ, बिस्कीट आणि पाणी असा पुरवठा करण्यात येत आहे. वाहने रोखल्याने संताप मुंबईतील आझाद मैदान येथे जमलेल्या मराठा आंदोलकांसाठी ठाणे शहरातून मराठा समाजाचे कार्यकर्ते घराघरातून चटणी, भाकर, चपाती असे अन्न पदार्थ गोळा करून सोमवारी दुपारी मुंबईच्या दिशेने जात होती. ही वाहने ठाणे आणि मुंबईच्या वेशीवरील आनंदनगर नाक्याजवळ येताच मुंबई पोलिसांनी ही वाहने अडवून धरली. यामुळे मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करत घोषणाबाजी सुरू केल्याने परिसरात तणावाचे वातावरण होते. मराठा आंदोलकांनी हा अन्यायकारक प्रकार असल्याचे सांगत या घटनेचे निषेध नोदवून घोषणाबाजी सुरू केली आणि त्यानंतर पोलिसांनी ही वाहने सोडली, अशी माहिती मराठा मोचार्चे पदाधिकारी पांडुरंग भोसले यांनी दिली.

# मराठा आंदोलनाचा कलावंतांना फटका

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :**



मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे मुंबईतील बहुतांश भागातील रहदारी विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. त्याचा फटका आता कलावंतांनाही बसला आहे. मराठा आंदोलकांनी थेट मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीत शिरकाव करत तिथे घोषणाबाजी केली. यामुळे काहीशी नाराजी व्यक्त केली आहे. नाट्य कलावंत सदानंद बोरकर यांनी यासंबंधीचा एक किस्सा सांगितला आहे.

सदानंद बोरकर यांनी मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे 10 वर्षानंतर जहांगीर आर्ट गॅलरीत स्पेस मिळालेल्या आपल्या एका चित्रकार मित्राला मोठा फटका बसल्याचा दावा केला आहे. ते आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हणाले, रंगाचा बेरंग जाहला! मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत माझ्या एका मित्राचे कलाप्रदर्शन सुरु होते. देश विदेशातील लाखो चित्रकार ईथे आपल्या कलाकृतीचे प्रदर्शन आयोजित व्हावे म्हणून आयुष्य वेचतात. वर्षानुवर्ष वाट बघतात. जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शनासाठी कलाकृतीना जागा मिळणे म्हणजे कलाकारांचं जीवन सफल होणे असे समीकरण आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

आपल्या कलाकृतीना प्रदर्शनासाठी दालन मिळावे यासाठी यां मित्रानी 10 वर्षांपूर्वीच व्यवस्थापनाकडे अर्ज केला होता. रांगेतील कलाकार पूर्ण होईपर्यंत दहा वर्षे लोटलीत. आणि अखेर ऑगस्ट 2025 च्या शेवटच्या आठवड्यात प्रदर्शनीची तारीख मिळाली.

भारतात सर्वात जास्त कलाप्रेमी आणि चित्रांचे खरीददार मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीला भेट देतात. देश विदेशातील चित्र रसिक करोडोच्या पेंटिंग इथूनच विकत नेतात. कुठलाच चित्रकार रिकाम्या हाताने घरी परत येतं नाही. चित्रांची खरी किंमत याचं गॅलरीत होते.

### पाच वर्षांत कर थकबाकी नसलेली व्यक्तीच निवडणुकीला उभी राहू शकेल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**

ग्रामपंचायत निवडणुकीत उभं राहायचं स्वप्न असेल, तर आता थकबाकीदारांना धक्का बसणार आहे. सरकार लवकरच नवी पात्रता लागू करणार असून, पाच वर्षांत कर थकबाकी नसलेली व्यक्तीच निवडणुकीला उभी राहू शकेल. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबतचे संकेत सरपंच कार्यशाळेत दिले.

गावागावातील थकीत कराचा बोजा शासनासमोर मोठं आव्हान बनला आहे. यावर उपाय म्हणून "समृद्ध पंचायतराज अभियान" राबवण्यात येणार असून, एकरकमी कर भरल्यास ५० टक्के माफी देण्याचा निर्णय लवकरच होणार आहे. मात्र, कर न भरणाऱ्यांना ग्रामपंचायत सत्तेत संधी न देण्याचा सरकारचा निर्धार स्पष्ट झाला आहे. सोलापूर येथे बोलताना मंत्री गोरे यांनी सांगितलं की, गावचे प्रश्न गावातच सुटावेत म्हणून हा पायंडा घालून दिला जातोय. गायरान जमिनीवर घरकुल परवानगीच्या तक्रारींचा उल्लेख करत त्यांनी सरळ आश्वासन दिलं "गरज पडली तर नियम बदलू, कायदा बदलू, पण गावाचं विकासकाम थांबणार नाही." आता प्रश्न असा की, गावाच्या कारभाराची सूत्रं हाती घ्यायची असतील, तर कराची जबाबदारी टाळून चालणार नाही. नवी अट लागू झाल्यानंतर नेमके किती इच्छुक उमेदवार पात्र ठरतील, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

# मेळघाटातील 22 गावे अजूनही विजेविना



## खुटीदा गावातील शिक्षकांचा जीवघेणा प्रवास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 1)** – अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा आदिवासी बहुल आणि दुर्गम भाग आजही विकासाच्या मूलभूत सोयींपासून वंचित आहे. चिखलदरा तालुक्यातील एकताई ग्रामपंचायत अंतर्गत खुटीदा आणि सुमिता ही गावे अजूनही विजेविना आहेत.

याचप्रमाणे मेळघाटातील एकूण 22 गावे अंधारात असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने ग्रामस्थ आणि शिक्षकांना अत्यंत कठीण परिस्थितीत जगावे लागत आहे.

### ग्रामस्थांचा सवाल

शिक्षकांना शाळेत जाण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागत असेल, विद्यार्थी शिक्षणासाठी संकटांना सामोरे जात असतील आणि ग्रामस्थांना अजूनही अंधारातच जगावे लागत असेल, तर शासनाची 'सर्व शिक्षण सर्वांना' आणि 'सर्वांना वीज' ही घोषवाक्ये केवळ कागदोपत्रीच राहिली आहेत का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

### वीजपुरवठ्याविना अंधारात गावे

खुटीदा व सुमिता या गावांना आजतागायत वीज मिळालेली नाही. मेळघाटातील 22 गावे आजही अंधारात असून काही वर्षांपूर्वी बसवण्यात आलेले सोलर लाईट्स बंद पडल्यामुळे ग्रामस्थांना पुन्हा अंधारातच जीवन कंठावे लागत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, महिलांच्या दैनंदिन कामांवर आणि ग्रामस्थांच्या सुरक्षिततेवर होत आहे.

### 75 वर्षानंतरही विकास शून्य

स्वातंत्र्यानंतर तब्बल पंच्याहत्तर वर्षे झाली, तरी मेळघाटातील अनेक गावे आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. सुरक्षित रस्ते नाहीत, पूल नाहीत, वीजपुरवठा नाही आणि सोलर लाईट्स देखभाल अभावी बंद पडले आहेत. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### ग्रामस्थांचा आक्रोश

ग्रामस्थ आणि शिक्षकांनी शासनाकडे मागणी केली आहे की खंडू नदीवर पूल उभारून खुटीदा शाळेसाठी सुरक्षित रस्ता उपलब्ध करून द्यावा. तसेच मेळघाटातील 22 गावांना तातडीने वीजपुरवठा करण्यात यावा आणि बंद पडलेल्या सोलर लाईट्सची दुरुस्ती करून कायमस्वरूपी व्यवस्था उभारावी. मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी. याशिवाय ज्या शिक्षकांच्या बदल्या झालेल्या आहेत त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून नवीन शिक्षक शाळांमध्ये नेमले जावेत.

### खंडू नदी ओलांडून शिक्षकांचा जीवघेणा प्रवास

खुटीदा गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत जाण्यासाठी शिक्षकांना दररोज खंडू नदी पार करावी लागते. पावसाळ्यात ही नदी भरून प्रचंड वेगाने वाहते. अशा वेळी नदी ओलांडणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. तरीही विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून शिक्षक दररोज धोका पत्करतात. विद्यार्थ्यांनाही शाळेत जाण्यासाठी हाच जीवघेणा प्रवास करावा लागतो. काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिली होती आणि शिक्षकांवर कारवाई केली होती, मात्र स्थानिक परिस्थिती किती बिकट आहे हे दुर्लक्षिल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. नदीवर पूल नसल्याने ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

# परतवाडा-अंजनगाव मार्गावर आढळला महिलेचा कुजलेला मृतदेह

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, (दि. 1)** परतवाडा ते अंजनगाव रोडवरील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या हद्दीत येणाऱ्या शेतशिवारात एका अज्ञात महिलेचे कुजलेले प्रेत आढळले. अंदाजे 30 ते 40 दिवसांपूर्वी मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.




घटनास्थळी गुलाबी रंगाची साडी आणि ब्लाऊज परिधान केलेली महिलेचा मृतदेह आढळून आला. तसेच काळा धागा आणि सेफ्टी पिनही मिळाले आहेत. मृतदेह कुजलेला व हाडासारखा झाल्याने ओळख पटविण्यात अडचणी येत आहेत. घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तसेच फॉरेन्सिक विभागाची टीमही तपासासाठी दाखल झाली आहे. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिस प्रयत्न करत असून पुढील तपास ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या प्रकरणामुळे परिसरात तर्क-वितर्कांना उधाण आले असून, तपासात नवीन बाबी समोर आल्यास प्रकरण अधिक गूढ होण्याची शक्यता आहे.

# विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

**अमरावती** – समीपस्थ वलगावमध्ये विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू येथील रहिवासी शैलेश गोविंद अंभोरे (30) याचा वलगाव येथील प्राचीन विहिरीत पाहताना तोल गेला आणि तो विहिरीत पडून त्याचा मृत्यू झाला. शैलेश अंभोरे त्याच्या पत्नी आणि मुलांसह स्टेशनरी विकण्यासाठी वलगाव येथे आला होता. सकाळी 8 वाजता तो वलगाव येथील गणेडीवाल रुग्णालयामागील जुनी विहीर पाहण्यासाठी गेला होता. विहिरीजवळ उभा असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो थेट पाण्यात पडला. काही वेळातच त्याचा मृत्यू झाला. स्थानिक लोकांनी तात्काळ वलगाव पोलिस ठाण्याला माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि बचाव कर्मचाऱ्यांना बोलावण्यात आले. बचाव कर्मचाऱ्यांनी विहिरीत उतरून मृतदेह बाहेर काढला आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात नेला. तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. शैलेश अंभोरे त्याच्या कुटुंबाला उठवण्यासाठी खूप कष्ट करत असे. परंतु, एका क्षणाच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे वलगावमध्ये एकच खळबळ उडाली आहे. विहिरीच्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये संताप आहे. वलगाव पोलीस अधिक तपास करत आहेत.

# यशोदा नगर चौकातील जबरी चोरी प्रकरणात एक अटकेत

- एक अल्पवयीनही ताब्यात
- गुन्हे शाखेची धडक कारवाई
- एका आरोपीला नागरिकांनीच पकडले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 1)** यशोदा नगर चौक येथे झालेल्या जबरी चोरीच्या प्रकरणी अमरावती शहर गुन्हे शाखेने तत्पर कारवाई करत एका आरोपीला अटक केली असून, एक विधी संघर्षीत बालकाला ताब्यात घेतले आहे. या गुन्ह्यातील एका विधी संघर्षीत बालकाला नागरिकांनीच घटनास्थळी पकडले होते, तर उर्वरित आरोपीला पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे अटक केली.

फिर्यादी भास्कर महादेव सर्गे (रा. यशोदा नगर, अमरावती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 31 ऑगस्ट रोजी ते आपल्या मोपेडने यशोदा नगर चौकात गेले असता, तीन अनोळखी तरुणांनी त्यांना लाठीचा धाक दाखवून जबरीने खिशातील 650 रुपये काढून घेतले. तसेच त्यांच्या दुचाकीची चावी हिसकावण्याचाही प्रयत्न केला. फिर्यादीने आरडाओरड केल्याने स्थानिक नागरिकांनी एका आरोपीला पकडले, तर दोन आरोपी पसार झाले. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. याप्रकरणात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी गुन्ह्याची दखल घेऊन पथकास आरोपींना तातडीने शोधून काढण्याचे आदेश दिले. सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गुप्त माहितीच्या मदतीने छाननी केली असता, आरोपी यशोदा नगर परिसरात असल्याची माहिती मिळाली. यानुसार 1 सप्टेंबर रोजी पथकाने राहुल दीपक धर्माळे (वय 19, रा. यशोदा नगर नं. 1, गल्ली नं. 2) व दोन विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून पुढील तपासासाठी त्यांना फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, एपीआय महेश इंगोले यांच्यासह अंमलदार सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, जहीर शेख, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, नईम बेग, विशाल वाकपांजर, राजिक रायलीवाले, सागर ठाकरे, निलेश वंजारी यांनी केली.

# जिल्हा परिषद आरक्षण नियमाने खळबळ

## पालकमंत्र्यांना निवेदन
## इच्छुकांमध्ये नाराजी
## न्यायालयीन लढ्याचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि. 1)** – आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने 20 ऑगस्ट रोजी काढलेल्या अधिसूचनेद्वारे आरक्षण पद्धतीत बदल होणार असल्याचे स्पष्ट झाले. या निर्णयामुळे तब्बल 46 प्रभागांतील इच्छुकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.

या संदर्भात माजी जिल्हा परिषद सभापती तात्यासाहेब मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली भाजप पदाधिकाऱ्यांनी महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर केले. या निवेदनात 1996 च्या नियमानुसार सुरू असलेला



आरक्षणाचा चक्रानुक्रम कायम ठेवावा आणि नव्या नियमांना मागे घ्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. नवीन नियमानुसार अनुसूचित जातींचे 18, अनुसूचित जमातींचे 12 तर नामाप्र प्रवर्गाचे 2 प्रभाग आरक्षणापासून वंचित राहणार आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे स्थापनेपासून आरक्षणापासून वंचित असलेले काही प्रभाग पुढील 25 ते 30 वर्षेही संधीपासून वंचित राहतील; उलट काही प्रभागांत 65 ते 70 वर्षांपासून सलग आरक्षण कायम राहणार आहे. यामुळे इतर प्रवर्गातील इच्छुकांना अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत आहे. या निर्णयाविरोधात कार्यकर्त्यांनी शासनाने तातडीने दखल न घेतल्यास न्यायालयीन लढा उभारण्याचा इशारा दिला आहे. या वेळी माजी जि.प. सदस्य सदाशिव खडके, शरद मोहोड, रूपाली सोंडे, इंद्रभूषण सोंडे, रुपेश ढोले, सुनील गवळी, विलास पाटील, मंगेश गावंडे, प्रतिक खेरडे, रोहीत घोरपडे, श्रीराम आढोणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. शासनाच्या निर्णयाविरोधात जिल्हाभरात तीव्र असंतोष निर्माण झाला असून आरक्षण नियम मागे घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# सहा अवैध दारूविक्रेत्यांना अटक, 2.95 लाखांचा मुद्देमाल जप्त

**गौरी-गणेशोत्सव काळात तिवसा पोलिसांची धडक मोहीम**

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि. 1)** – गौरी-गणेशोत्सव काळात शांतता व सुव्यवस्था टिकवण्यासाठी तिवसा पोलिसांनी अवैध दारूविक्रीवर धडक मोहीम हाती घेतली. शनिवारी (दि. 30) घेण्यात आलेल्या या विशेष कारवाईत पोलिसांनी तब्बल 2,95,250 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सहा आरोपींना ताब्यात घेतले आहे.

सणासुदीच्या काळात गावागावात व शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, अवैध दारूविक्रीला आळा बसावा यासाठी पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. कारवाईदरम्यान आरोपी पंकज खोब्रागडे, अमर वाघमारे, मनोज खोब्रागडे (रा. शिरजगाव मोझरी), अंकुश ब्राह्मणे, आकाश ब्राह्मणे, सतीश नरोडे (रा. मोझरी) यांच्याकडून हातभट्टीसाठी लागणारा सुमारे 250 लिटर मोहाचा सडवा, दारू गाळण्याचे व साठविण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. हा सर्व मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून आरोपींविरुद्ध दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पीआय गोपाल उपाध्याय, एपीआय उमेश पिसाळकर, एपीआय अक्षय भागानगरे, एएसआय अरविंद गावंडे, पोलिस हवालदार प्रदीप म्हस्के, सागर क्षीरसागर व तिवसा पोलीस स्टेशनचे पथक सहभागी झाले होते.

# परदेश शिष्यवृत्ती अर्जाची मुदतवाढ

**अमरावती** – राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पदव्युत्तर पदवी व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत 1 सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. या अगोदर अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही. इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाइन [http://fs.maharashtra.gov.in](http://fs.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर भरून त्याची प्रिंट संबंधित कागदपत्रांसह पुण्यातील समाज कल्याण आयुक्तालयात 1 सप्टेंबर 2025 रोजी संध्याकाळी 6.15 वाजेपर्यंत सादर करावी, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



नांदगाव खंडेश्वर – तालुक्यातील माहूली (चोर) येथील निलेश वसंतराव गासे यांच्या कडील महालक्ष्मी.

# मोर्शीत पोलिसांची धडक कारवाई

## 1.36 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि. 1)** – गणेशोत्सवासह होणारे सण उत्साहात व शांततेत पार पडावेत यासाठी मोर्शी पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध धडक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान दारूची तस्करी करणाऱ्या दोन



आरोपींना पकडून 1 लाख 36 हजार 900 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. 31 ऑगस्ट रोजी ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त माहितीच्या आधारे मोर्शी टी-पॉईंट येथे नाकाबंदी केली. त्यावेळी मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यातील मंझेरा घोगरा येथील शिवपाल रमेश धुर्वे (30) व अल्केश रामसा धुर्वे (20) हे दोघे पल्सर मोटरसायकलवरून देशी दारूची अवैध वाहतूक करताना आढळले. त्यांच्याकडून 100 नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीची बाटल्या तसेच मोटरसायकल असा मिळून एकूण 1,35,900 किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पो.उपनिरीक्षक आकाश शिवणकर, अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर व अथर्व कोहळे यांचा समावेश होता. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

### अवैध दारू वाहतूक करणारे दोन आरोपी ताब्यात

# चांदूर रेल्वे शहरात तक्रारीच्या ठिकाणी अतिक्रमण मोहीम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि. 1)** – नगर परिषद, चांदूर रेल्वे व पोलिस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर व महत्त्वाच्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्याची धडक मोहीम राबविण्यात आली. तक्रारीच्या अनुशंगाने 2 – 3 ठिकाणी ही मोहीम राबवून स्थगित करण्यात आली. शहरातील काही ठिकाणी नागरिक व दुकानदारांनी केलेल्या अतिक्रमणासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. विशेषतः मेन रोडवरील फळ व भाजी विक्रेत्यांना प्रशासनाने स्पष्ट सूचना दिल्या की, त्यांच्या व्यवसायामुळे मुख्य रस्त्यावर अतिक्रमण झाल्यास त्यांच्यावर कायदेशीर



कारवाई करण्यात येईल.

या मोहिमेत नगरपरिषद अधिकारी-कर्मचारी व पोलीस प्रशासनाने सक्रिय सहभाग घेतला. ठाणेदार अजय आकरे, सहाय्यक ठाणेदार शरद आहेर, पीएसआय नंदलाल लिंगोट, पीएसआय नितेश आझडे, पीएसआय श्री. झाडे, पोलीस कर्मचारी शिवाजी घुगे, प्रशांत ढोके, राहूल वानखडे, राहूल इंगळे, नितीन शेंडे, प्रविण मेश्राम संदिप वासनिकतसेच महिला अंमलदार व अन्य पोलिस कर्मचारी याशिवाय नगर परिषदेतर्फे आशीष कुरूहाडे, जितेंद्र कर्से, किर्ती जावळे शारदा कावळे, श्वेता डोंगरे, पायल तायडे, संजय कर्से, पंकज इमले, संजय वानखेडे, अमोल भुजाडे, मनीष कनोजे, राजेश शिर्के, अनंत वानखडे, मयूर घोडेस्वार, निरज दुबे, अमोल कडू, बबलू इमले, रोशन समुंद, विशाल कनोजे, नरेंद्र कर्से, विजय कनोजे, गणपत इमले, नितीन इमले व इतरांनी परिश्रम घेतले.

### नितीन गवळींची मध्यस्थीची भुमिका

अतिक्रमण मोहीम स्थगित करा अशी मागणी करीत आम आदमी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना (ठाकरे गट) यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. त्यामुळे न.प. कडून सरसकट अतिक्रमण मोहीम न राबविता केवळ तक्रारीच्या ठिकाणी मोहीम राबविल्याचे पहावयास मिळाले. अतिक्रमण मोहीमेवेळी माजी न.प. उपाध्यक्ष तथा आप नेते नितीन गवळी यांनी प्रशासन व अतिक्रमणधारक यांच्यात मध्यस्थिची भुमिका निभवली. यामुळे नागरिकांनी नितीन गवळींचे आभार मानले.

### सीओंची अनुपस्थिती बनली चर्चेचा विषय

तक्रारीच्या ठिकाणचे अतिक्रमण काढतेवेळी अनेक वादविवाद निर्माण होतात. त्यामुळे या ठिकाणी मुख्याधिकारी उपस्थित असणे आवश्यक होते. मात्र शहरात सदर मोहीम राबवितेवेळी मुख्याधिकारी अनुपस्थित असल्यामुळे सदर विषय चर्चेचा बनला होता. मुख्याधिकारी गैरहजर असल्याचे माहित असतांना सदर मोहिमेकरिता दुसरा दिवस का निवडला नाही असा सवाल सुद्धा उपस्थित झाला आहे.

**जाहिर सुचना**

परिशिष्ट एच, क्रमांक 4
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वर्धा.
श्रीमती ए.बी. कादियान यांचे न्यायालयात
5वे सह-दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा., वर्षा, वर्धा.
कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमूना)
(आदेश 38, नियम 6)
विवाह अर्ज/216/2025
सौ. किरण श्याम आडे वि. श्री. श्याम हरिचंद आडे
पुढिल तारिख = 30-09-2025

प्रति,
श्री. श्याम हरिचंद आडे
राह. परसोडा, तह. चांदुर बाजार, जिल्हा अमरावती, चांदूर बाजार,
AMRAVATI, MAHARASHTRA

ज्याअर्थी, वर नामनिर्दिष्ट केलेला याने या न्यायालयाकडे असा अर्ज केलेला आहे; म्हणून, याद्वारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख 30-09-2025 रोजी मध्यान्ह 11 वाजता तुम्ही या अर्जाविरुध्द कारण दाखविण्यासाठी या न्यायालयामध्ये हजर रहावे; तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज 12-08-2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

5वे सह-दिवाणी न्यायाधीश,
वरिष्ठ स्तर, व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, वर्धा.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मोकाट जनावरांचा उपद्रव कायमच!

## राष्ट्रसंत कॉलनी रिंग रोडवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला धोका





मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करून सुरक्षित वातावरण निर्माण करावे असे सामाजिक कार्यकर्ते अश्वपाल वानखडे यांनी म्हटले आहे.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच नागरिकांच्या सोयीसाठी मोकाट जनावरे त्वरित हटवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशील बेले यांनी म्हटले आहे. अपघात घडल्यावर प्रशासन जबाबदार धरणार कोण, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि. 1 )** – वरूड नगर परिषदेकडून वारंवार तक्रारी होऊनही मोकाट जनावरांचा बंदोबस्त अद्याप झालेला नाही. सध्या राष्ट्रसंत कॉलनी रिंग रोड परिसरात या जनावरांनी मुक्काम ठोकला असून, या मार्गाने शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे कधीही गंभीर अपघात अथवा अपरिचित घटना घडण्याची भीती नागरिकांत व्यक्त केली जात आहे. रिंग रोडवर गर्दीच्या वेळी गायी-म्हशींचे कळप रस्ता अडवून उभे राहतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतोच, पण दूचाकीस्वार व लहान मुलांना मोठा धोका निर्माण होतो. काही जनावरे आक्रमक होत असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना भीतीचे वातावरण जाणवते.

नगर परिषदेकडून जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी वेळोवेळी केली आहे. मात्र, अद्यापही ठोस उपाययोजना झालेली नाही. नगरपरिषद झोपेत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# रुईपठार ते डोमी रस्ता रोजगार हमीतून दुरुस्ती करण्याची आदिवासी बांधवांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि. 1 )** – रुईपठार ते डोमी या गावांना जोडणारा रस्ता सध्या अतिशय दयनीय अवस्थेत असून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. सततच्या पावसामुळे रस्ता उखडून गेला असून मोठमोठे बोल्डर रस्त्यावर पडले आहेत. त्यामुळे गावकऱ्यांना दैनंदिन ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषतः रुग्णांना वेळेत दवाखान्यापर्यंत पोहोचणे कठीण बनले असून गंभीर आजारी व्यक्तींना योग्यवेळी उपचार मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. मोटरसायकलने प्रवास करतानाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. डोमी गावातील आदिवासी बांधवांचे जीवन या रस्त्यावर अवलंबून असल्याने परिस्थिती अधिक गंभीर आहे. गावकऱ्यांची ठाम मागणी आहे की हा रस्ता रोजगार हमी योजनेतून तातडीने दुरुस्त करावा. यामुळे गावातील तरुणांना रोजगाराची संधी मिळेलच, शिवाय नागरिकांच्या दैनंदिन



जीवनातील अडचणी दूर होतील. रस्ता दुरुस्त झाल्यास आरोग्य, शिक्षण तसेच इतर शासकीय सोयी-सुविधांचा लाभ वेळेत घेता येईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष



देऊन काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी डोमी येथील आदिवासी बांधवांनी केली आहे.

# अंजनगाव बारीत गणरायाचे वाजत-गाजत आगमन

## लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळाच्या ढोलपथक मिरवणुकीने वेधले सर्वांचे लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि. 1 )** – 14 विद्या आणि 64 कलांचा अधिपती मंगलमूर्ती गणरायाचे आगमन अंजनगाव बारीसह परिसरात दि. 27 रोजी मोठ्या जल्लोषात झाले. घरोघरी व सार्वजनिक मंडळांमध्ये बाप्पाची प्रतिष्ठापना ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-चिपळ्यांच्या निनादात आणि जयघोषात पार पडली. गणेश चतुर्थी निमित्त संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

गांधी चौकातील लोकमान्य टिळक गणेशोत्सव मंडळाच्या ढोलपथक मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधले, तर न्यू आझाद मंडळ व श्री गुरुदेव मंडळांमध्ये डीजेच्या तालावर तरुणाईनं जल्लोष केला. याशिवाय चंदनशेष गणेशोत्सव मंडळासह इतर नवीन मंडळांनीही गणेशाचे आगमन मोठ्या थाटामाटात साजरे केले.

गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी तरुणाईत उत्साह, सजावट, रोषणाई, ढोल-ताशांचा गजर यामुळे अंजनगाव बारी शहरात दिवसभर उत्सवमूर्तीचे वातावरण होते. नागरिकांनीही घराघरात लाडक्या बाप्पाचे स्वागत करून मंगलमूर्तीची पूजा केली. शहरभर होणाऱ्या उत्सवी कार्यक्रमांसाठी प्रशासनाकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नगरपरिषदेतर्फे इको फ्रेंडली गणेशोत्सव स्पर्धा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.1 )**– महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून साजरा होणारा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने व्हावा यासाठी मोर्शी नगर परिषदेतर्फे स्वच्छ सर्वेक्षण 2025 व माझी वसुंधरा अभियान 6.0 अंतर्गत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक विजेत्या मंडळाला 31 हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी 21 हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी 11 हजार रुपये तर दोन उत्कृष्ट मंडळांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी प्रवेश निःशुल्क असून इच्छुक मंडळांनी 3 सप्टेंबरपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे, असे मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी कळविले. पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात येत असून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मंडळांना काही नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये मंडळातील सर्व सदस्य 18 वर्षांवरील असणे, प्राधिकरणाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे, पंडालमुळे वाहतुकीस अडथळा न आणणे, मूर्ती व सजावटीसाठी वापरण्यात येणारे साहित्य पर्यावरणपूरक असणे, देखाव्यातून स्वच्छता, देशप्रेम, सामाजिक रूढी आणि पर्यावरणपूरक संदेश देणे, सौरऊर्जेचा वापर करणे, वृक्षारोपण व स्वच्छता उपक्रम राबवणे आदी अटींचा समावेश आहे.

या स्पर्धेच्या परीक्षणासाठी शेखर चौधरी (वृक्ष संवर्धन समिती अध्यक्ष), नवीन पेठे (न्यू जनरेशन केअर फाउंडेशन अध्यक्ष), निलेश रोडे (निर्भय बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष), श्रीकांत देशमुख (मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल), अभिलाष व्यवहारे (वारसा संस्था अध्यक्ष), पूनम मोहोड (संचालिका, ए.आर. पाटील पब्लिक स्कूल), सुमिता चोरगे (सहाय्यक पोलीस निरीक्षक) आणि नगरपरिषदेच्या विद्युत विभागाच्या अभियंता मिनल तट्टे यांची परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. स्पर्धेच्या नियमावली व नोंदणीसाठी नगरपरिषदेतील वैष्णवी राय व सोहेल शाहा (मो. 8379040356) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले यांनी केले आहे.

# रस्त्यावर रेतीचा ढीग, ग्रामपंचायतीची बेफिकीरी

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा** – अचलपूर तालुक्यातील देवमाळी ग्रामपंचायत परिसरातील गुणवंत महाराज रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रेतीचा ढीग टाकण्यात आल्यामुळे नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या रेतीच्या ढिगाऱ्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणे कठीण झाले असून, वाहतुकीत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

केवळ वाहतुकीतच अडथळा नाही, तर रस्त्यालगत असलेल्या नाल्या सुद्धा रेतीमुळे बंद झाल्या आहेत. त्यामुळे पाणी साचून राहण्याचा आणि रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, या प्रकाराविरोधात संताप वाढत आहे.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची चिंता वाढली आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असताना, या रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी ही ग्रामस्थांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. गुणवंत महाराज रस्ता हा देवमाळी आणि महसूल प्रशासन रस्ता जोडणारा महत्वाचा मार्ग असल्याने येथे सतत वर्दळ असते. त्यामुळे अपघाताचा धोका सुद्धा निर्माण झाला आहे.

## नागरिकांकडून तातडीच्या कारवाईची मागणी

### प्रशासन कारवाई करणार का?

ग्रामपंचायत प्रशासनाकडे नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या असून, अडथळा तातडीने दूर करण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायत आणि महसूल प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. अन्यथा नागरिकांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला जाईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# रसिकांना भारावून टाकणारी निवड फेरीतील सादरीकरणे

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 1 )** – कच्चे धागे सच्चे प्यार के, ना तोडना ढोलना... या हृदयस्पर्शी गाण्याच्या स्वरांनी अष्टविनायक सभागृहात एक आगळावेगळा माहोल तयार झाला. स्वरांच्या लयींमध्ये आणि भावनांच्या ओलाव्यात प्रत्येक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाला.

भव्य स्वरविदर्भ स्पर्धेच्या निवड फेरीसाठी विदर्भातील कानाकोपऱ्यातून कलावंतांनी उपस्थिती लावली. स्व. वामनराव केशवराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी पांढरघाटी व शाळा व्यवस्थापन समिती पांढरघाटी यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम 30 ऑगस्ट रोजी सकाळी नऊ



वाजता वरुड येथील अष्टविनायक सभागृहात पार पडला.

गायक-गायिकांनी आपल्या सुमधुर सुरांनी रसिकांच्या हृदयाला स्पर्श केला. काहींच्या आवाजात वेदना दडल्या होत्या, तर काहींच्या सादरीकरणात उर्जा आणि जोश होता. एका गाण्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला, तर दुसऱ्या गाण्यावर सभागृहात दाट भावनांचे वातावरण निर्माण झाले.

आता सर्वत्र उत्सुकता आहे ती अंतिम फेरीची. येत्या 4 सप्टेंबरला होणाऱ्या अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांमधून कोण विजेतेपद पटकावणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विजेत्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते होणार असून, हा क्षण रसिक व कलाकारांसाठी संस्मरणीय ठरणार आहे. स्वरविदर्भ ही केवळ गायन स्पर्धा नसून, नवोदित कलाकारांच्या आयुष्याला नवा दिशा देणारे व्यासपीठ आहे. या मंचावर उमटणारे सूर विदर्भाच्या सांस्कृतिक परंपरेला उजाळा देणार आहेत. या निवड फेरीतील कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव सानप यांनी केले. सूत्रसंचालन नरेंद्र पाटील यांनी तर आभारप्रदर्शन सुधीर कांबळे यांनी केले. 4 सप्टेंबरला नेमका कोण ठरणार स्वरविदर्भाचा सुरांचा बादशाह? हे पाहण्यासाठी रसिक आतुरतेने वाट पाहत आहेत.

# मेळघाटातील आरोग्य व शिक्षण व्यवस्था कधी सुधरेल?

**वार्तापत्र**

**मारोती पाटणकर, चुरणी**

अमरावती जिल्ह्यातील डोंगराळ व आदिवासीबहुल मेळघाट परिसर निसर्गाच्या सान्निध्यात वसला असला तरी येथे आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांची अवस्था आजही अत्यंत चिंताजनक आहे. कुपोषण, बालमृत्यू आणि अशिक्षण यामुळे या भागाचा चेहरामोहरा बदलत नाही, शासनाच्या योजना कागदावरच मर्यादित राहिल्या आहेत, अशी तीव्र नाराजी स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

आरोग्य व्यवस्थेची अवस्था



विशेषतः गंभीर आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे अस्तित्वात असली तरी तेथे डॉक्टर नियमित राहत नाहीत. औषधांचा तुटवडा, उपकरणांची कमतरता, नर्स व आरोग्यसेवकांची अपुरी संख्या यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. पावसाळ्यात रस्ते वाहून जातात, पूल तुटतात आणि गावे जगापासून तुटून पडतात. अशा वेळी रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकत नाही. परिणामी गंभीर रुग्णांचे प्राण धोक्यात येतात. लहान मुलांचे कुपोषण अजूनही तीव्र असून बालमृत्यू दर चिंताजनक पातळीवर आहे. माता योग्य पोषणाअभावी आजारांना बळी पडतात.

### काय म्हणतात गावकरी

आमच्या लेकरांना वेळेवर डॉक्टर मिळत नाहीत, शाळेत शिक्षक नसतील तर मुलं शिकणार कशी? आमच्या मतांचा उपयोग फक्त निवडणुकीपुरता का? नागरिकांची ठाम मागणी आहे की प्रत्येक आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी डॉक्टर-नर्स नियुक्त व्हाव्यात, औषधे व उपकरणे उपलब्ध करावीत, दुर्गम भागांना पक्क्या रस्त्यांनी जोडून रुग्णवाहिका सेवा सुलभ करावी. शिक्षण क्षेत्रातील रिक्त पदे तातडीने भरावीत आणि स्थानिक तरुणांना प्रशिक्षित करून आरोग्यसेवक व शिक्षक म्हणून नियुक्त करावे. मेळघाटात आरोग्य व शिक्षण क्षेत्र सुधारले तरच या भागाचा विकास होईल, अन्यथा नागरिकांचा सवाल पुढील पिढ्यांनाही कायम राहणार आहे.

आरोग्यासोबत शिक्षण क्षेत्रातही परिस्थिती काही वेगळी नाही. अनेक शाळांत शिक्षकांची टंचाई आहे. जास्त विद्यार्थी असलेल्या शाळेत फक्त दोनच शिक्षक कार्यरत असतात. शाळांच्या इमारती जीर्णावस्थेत असून पावसाळ्यात छप्पर गळते, बाकं-टेबल्स मोडकळीस आले आहेत. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना जंगलातून चालत शाळेत जावे लागते, त्यामुळे हजेरी कमी राहते. विशेषतः मुलींचे शिक्षण धोक्यात येते आणि वयात आल्यानंतर त्यांचे शिक्षण अर्धवट थांबते. परिणामी लवकर लग्न लावले जाण्याचे प्रकार दिसून येतात.

गेल्या काही वर्षांत मेळघाटासाठी मोबाईल आरोग्य सेवा, पोषण आहार योजना, बालसंगोपन केंद्रे, निवासी शाळा आदी योजना राबवल्या गेल्या. मात्र त्याचा ठोस परिणाम नागरिकांच्या जीवनमानावर झालेला नाही. अधिकारी दौरे करतात, फोटोसेशन होते, मोठमोठी वक्तव्ये होतात; पण दुसऱ्याच दिवशी गावकरी पुन्हा जुन्या समस्यांना सामोरे जातात.




क्रांती चौकाचा राजा, क्रांती चौक, चांदूर रेल्वे



युवक गणेश मंडळ, खडकपुरा चांदूर रेल्वे



राजे विर संभाजी गणेशोत्सव मंडळ, इंदिरा नगर ,चांदूर रेल्वे



राधा नगर गणेश मंडळ, राधा नगर, चांदूर रेल्वे



श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मित्र मंडळ, छ. शिवाजी नगर , चांदूर रेल्वे



सरदार गणेशोत्सव मंडळ, सरदार चौक

# मस्त मेयोनीज सँडविच

**झटपट रेसिपी**

संध्याकाळी खाण्यासाठी मस्तपैकी व्हेज मेयोनीज सँडविच तयार करता येईल. झटपट होणारं हे सँडविच तुम्हाला नक्कीच आवडेल.

**सामग्री:** आठ ब्रेड स्लाईस, चार ते पाच चमचे मेयोनीज, बारीक चिरलेले दोन कांदे, बारीक चिरलेली सिमला मिरची अर्धा कप, किसलेलं गाजर पाव कप, अर्धा टी स्पून मिरपूड, चार टी स्पून हिरवी चटणी, चमचाभर लाल तिखट, दोन टी स्पून बटर, चवीनुसार मीठ.

**कृती:** एका भांड्यात सर्व भाज्या घाला. त्यात मेयोनीज, मीठ, लाल तिखट, मिरपूड घालून नीट मिसळून घ्या.



आता दोन ब्रेड स्लाईस घ्या. ब्रेडच्या या दोन्ही स्लाईसवर हिरवी चटणी लावून घ्या. एका स्लाईसवर भाज्यांचं मिश्रण पसरा. त्यावर दुसरा ब्रेड ठेवा. तव्यावर थोडं बटर घाला. आता हे सँडविच तव्यावर ठेवा. दोन्ही ब्रेड नीट भाजून घ्या. एका प्लेटमध्ये काढा. या सँडविचचे दोन त्रिकोणी तुकडे करा. चटणी आणि सॉससोबत खा.

# जोश

# ज्यूटपासून फॅन्सी वस्तूंची निर्मिती

**अचिव्हर**



जयपूरच्या बाजारपेठेत हस्तनिर्मित उत्पादनांना खूप मागणी आहे. त्यामुळे जयपूरमधील शेकडो तरुणांनी हस्तनिर्मित उत्पादनांच्या स्वरूपात वेगवेगळे स्टार्टअप सुरू केले आहेत आणि आता त्यांच्या खास उत्पादनांची मागणी परदेशात पोहोचली आहे. मनीष शर्मा यांनीही दीड वर्षांपूर्वी घरी जूटपासून एक उत्पादन बनवले होते. त्याचे लोकांनी एका प्रदर्शनात कौतुक केले होते. त्यानंतर त्यांनी ते स्टार्टअप म्हणून सुरू करण्याचा विचार केला.


कोलकाता येथून जूटचा कच्चा माल मागवून फॅन्सी उत्पादने बनवण्यास सुरुवात केली. प्रदर्शनांमध्ये लोकांना हे उत्पादन आवडले. अशा प्रकारे त्यांच्या जूट स्टार्टअपची सुरुवात झाली. मनीष जूटपासून ५० हून अधिक हस्तनिर्मित फॅन्सी उत्पादने तयार करतात. जूटचा वापर सामान्यतः पोती, कपडे, कार्पेट आणि दोरी बनवण्यासाठी केला जातो.

मनीष म्हणतात, की आज त्यांच्या जूट उत्पादनांना बाजारात मोठी मागणी आहे आणि त्यांनी ऑनलाइन वेबसाइटद्वारे त्यांचे स्टार्टअप पुढे नेले आहे. प्रचंड मागणी असल्याने आता हे काम सहाय्यक गट आणि लघु उद्योगांच्या महिला मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे शेकडो महिलांना रोजगार मिळाला आहे. मनीष ५० हून अधिक फॅन्सी वस्तू तयार करतात. त्यात पेन स्टँड, वॉश, फ्लॉवर पॉट्स, वॉल हँगिंग, टेबल आणि खुर्चीच्या मॅट्स, डी-कोस्टर आणि बॅग्ज यासारख्या सजावटीच्या उत्पादनांचा समावेश आहे.

तागाचे कापड हे तागाच्या वनस्पतीपासून बनवलेले फायबर आहे. तागाच्या काही वेगवेगळ्या वनस्पती, प्रजाती आहेत; परंतु कॉर्कोरस ऑलिटोरियसचा वापर प्रामुख्याने कापड बनवण्यासाठी केला जातो. तथापि, तागाची कॉर्कोरस कॅप्सुलरिस ही आणखी एक प्रजाती चांगली मानली जाते. त्याची लागवड कठीण असते. तागाची झाडे दहा फुटांपेक्षा जास्त उंच वाढतात आणि त्यापासून मिळणारे तंतू लांब दोरीमध्ये गोळा केले जातात. म्हणूनच तागाचे तंतू जगातील सर्वात लांब नैसर्गिक कापड तंतूंपैकी एक आहेत. ताग पाणी सहज शोषून घेतो आणि लवकर सुकतो. ही त्याची खासियत आहे.

# भविष्यात मागणी असलेल्या नोकऱ्या

**नोकरी हवीय?**



एआय आणि मशीन लर्निंग तज्ज्ञ: शिकू शकतील आणि जुळवून घेऊ शकतील अशा बुद्धिमान प्रणाली तयार करणे. या भूमिकांमध्ये अल्गोरिदम आणि मॉडेल्स विकसित करणे समाविष्ट आहे. ते मशीनस स्वायत्तपणे कार्य करण्यास सक्षम करतात.

✲ **शाश्वतता तज्ञ:** संस्थांना अधिक पर्यावरणपूरक बनण्यास मदत करणे. हे व्यावसायिक पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि हरित तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्पांवर काम करतात.


✲ **डिजिटल मार्केटिग व्यावसायिक:** ब्रँडचा प्रचार करण्यासाठी सतत बदलणाऱ्या डिजिटल लँडस्केपमध्ये नेव्हिगेट करणे. ते प्रभावी मार्केटिग धोरणे तयार करण्यासाठी डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल टूल्स वापरतात.

✲**आरोग्यसेवा कर्मचारी:** वृद्ध लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करणे. यामध्ये वृद्धांची काळजी, टेलिमेडिसिन आणि आरोग्यसेवा प्रशासनातील भूमिकांचा समावेश आहे.

✲ **टेक डेव्हलपर्स:** ब्लॉकचेन, व्हीआर आणि आयओटी सारख्या क्षेत्रात विशेषज्ञता असलेले. हे डेव्हलपर्स उद्योगांच्या डिजिटल परिवर्तनाला चालना देणारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करतात.

भविष्यातील मागणी असलेल्या नोकऱ्या समजून घेतल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर नियोजन प्रक्रियेला उदयोन्मुख संधींशी जुळवून घेण्यास मदत होऊ शकते.

**घ्या काळजी**



## लॅपटॉप पुसण्याची आदर्श पद्धत!

लॅपटॉप स्क्रीनवर धूळ, बोटांचे ठसे आणि डाग जमा होणे सामान्य आहे. बरेच लोक हे डाग काढण्यासाठी कोणतेही कापड उचलतात आणि स्क्रीन पुसतात; परंतु असे केल्याने स्क्रीनचे मोठे नुकसान होऊ शकते. चुकीच्या साफसफाईमुळे स्क्रीनवर ओरखडे येऊ शकतात कवा डिस्प्ले खराब होऊ शकतो.

**लॅपटॉप सफाईच्या टिप्स**


***प्रथम लॅपटॉप बंद करा आणि तो अनप्लग करा:** स्क्रीन साफ करण्यास सुरुवात करण्यापूर्वी, लॅपटॉप पूर्णपणे बंद करा आणि चार्जर कवा कोणत्याही पॉवर सोर्समधून काढून टाका. यामुळे सुरक्षितता तर राहीलच; पण स्क्रीनवरील धूळ आणि डाग स्पष्टपणे दिसतील.

✲ **फक्त मायक्रोफायबर कापड वापरा:** टिश्यू पेपर, खडबडीत कवा साध्या कापडाने कवा पेपर टॉवेलने स्क्रीन कधीही पुसू नका. यामुळे स्क्रीनवर बारीक ओरखडे येऊ शकतात. त्याऐवजी स्क्रीन स्वच्छ करण्यासाठी बनवलेले मायक्रोफायबर कापड वापरा.

✲ **हळूवारपणे पुसा:** स्क्रीन स्वच्छ करण्यासाठी दाबणे कवा घासणे टाळा.

# बंध जुळतील का?

**वेगळ्या वाटा**



२८ वर्षांचा तरुण असून सहा महिन्यांनी माझं लग्न होणार आहे. माझं अरेंज मॅरेज आहे. दिवसभरात दोन ते तीन वेळा आम्ही फोनवर बोलतो. माझी होणारी बायको कधी प्रेमळ संवाद साधते तर कधी पुरती गोंधळलेली वाटते. तिला माझ्याशी बोलण्यात रस नाही, असं मला वाटतं. कुटुंबासोबत असताना ती माझ्याशी खूप गोड वागते. पण मित्रमैत्रिणींसमोर तिचं वागणं पूर्णपणे बदललेलं असतं. ती तिच्या मित्रमैत्रिणींना जास्त प्राधान्य देते. यावरून आमची बरीच भांडणंही झाली आहेत. मित्रमैत्रिणींना भेटण्यासाठी तिने आमची भेटही रद्द केली. आमचं लग्न सहा महिन्यांवर आलं आहे. पण आमचे सूर काही जुळलेले नाहीत. हे लग्न मी मोडू का? मला मार्गदर्शन करा.

**उत्तर** : मित्रा, संवादाने अनेक प्रश्न सुटतात. तू तुझ्या होणाऱ्या बायकोशी मोकळेपणाने संवाद साध. तुला खटकणाऱ्या गोष्टी तिच्यापुढे मांड. तुम्ही ठरवून लग्न करताय. त्यामुळे तुला तिचे काही गुण आवडले असतीलच. या गुणांबद्दल विचार कर. लग्न करणं सोपं आहे. पण ते टिकवून ठेवणं खूपच कठीण आहे. त्यामुळे तुमचे स्वभाव जुळायला हवेत. तुम्ही एकमेकांना समजून घ्यायला हवं. तिच्याशी बोलल्याने प्रश्न सुटले नाहीत तर समुपदेशकांची मदत घे.

# स्लीम-स्मार्ट दिसण्यासाठी...

**स्टाईल स्टेटमेंट**



प्रत्येकालाच आपला लूक चांगला दिसावा असे वाटते. कपड्यांचा विचार केला जातो, तेव्हा योग्य रंग आणि स्टाईल खूप महत्त्वाची असते. बरेचदा दिसून येते की काही लोग ठराविक रंगांचे कपडे घातल्याने अधिक स्लिम आणि स्मार्ट दिसतात. कपड्यांचे रंग केवळ त्वचेचा रंग वाढवत नाहीत, तर शरीराचा आकारदेखील संतुलित करतात. काही खास रंग असे आहेत, जे शरीरातील चरबी लपवण्याचा भ्रम निर्माण करतात.

**कोणत्या रंगाचे कपडे?**

✲ **नेव्ही ब्लू रंग:** नेव्ही ब्लू रंग खूप पॉलिश आणि नीटनेटका लूक देतो. तो घातल्याने शरीराचा आकार संतुलित दिसतो आणि चरबीचे भाग जास्त दिसत नाहीत. हा रंग खूप चमकदार किवा खूप कंटाळवाणा नाही, म्हणून तो ऑफिस, पार्टी किवा अगदी कॅज्युअल डे आउटगमध्येही घालता येतो.

✲ **वाईन रेड कलर:** कोणत्याही फेस्टिव्ह किवा औपचारिक कार्यक्रमाला जात असाल, तर डीप बरगंडी म्हणजेच वाईन रेड कलर घाला. हा रंग खूप रिच आणि क्लासी दिसतो. या रंगाची खास गोष्ट म्हणजे तो प्रत्येक स्किन टोनवर चांगला दिसतो आणि शरीराला स्लिम दिसण्यासदेखील मदत करतो.

✲ **डार्क पर्पल कलर:** गर्दीपेक्षा वेगळे दिसायचे असेल तर डार्क पर्पल आउटफिट ट्राय करा. हा रंग स्टायलिश लूक देतो तसेच बॉडी फॅट लपवतो.

✲ **हिरवा रंग:** गडद हिरवा रंग परिपूर्ण असेल. हा रंग केवळ स्लिम लूकच देत नाही, तर चेहराही वाढवतो.

**ॲप वर्ल्ड**

## व्हॉट्स अपचे स्कॅम अलर्ट फीचर

व्हॉट्स अप वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी सतत नवीन फीचर्स जोडत आहे. या नवीन फीचरअंतर्गत एखाद्या वापरकर्त्याला एखाद्या ग्रूपमध्ये जोडणारी व्यक्ती कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये नसल्यास व्हॉट्स अप अलर्ट नोटिफिकेशन पाठवेल. या अलर्टमुळे त्या ग्रुपमध्ये किती लोक आहेत, यूजरच्या कॉन्टॅक्टमधील कोणताही सदस्य त्यात आहे की नाही आणि ग्रुप कधी सुरू झाला यासारखी महत्त्वाची माहिती मिळेल.




**चॅट न उघडता ग्रुपमधून बाहेर पडण्याचा पर्याय**

या अलर्टसोबत यूजर्सना काही सुरक्षा टिप्सदेखील दिल्या जातील; जेणेकरून ते स्कॅम टाळू शकतील. ग्रुप संशयास्पद वाटला, तर संबंधित हे चॅट न उघडता ग्रुप सोडण्याचा पर्याय निवडू शकतात. तथापि, यूजर इच्छित असेल, तर चॅट उघडून ग्रूपमध्ये सहभागी होऊ शकतो.

**हे नवीन फीचर का आवश्यक होते?**

स्कॅमर्सनी वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरील लोकांना व्हॉट्स अपवर जोडून अडकवण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः अशा ग्रुप्सचा वापर गुंतवणूक घोटाळ्यांसाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे, जिथे प्रथम लोकांना जोडले जाते नंतर त्यांना बनावट ॲप्स डाउनलोड करायला लावून पैसे उकळले जातात.

**डायरेक्ट मेसेज अलर्ट फीचर लवकरच**

व्हॉट्स अप सध्या डायरेक्ट मेसेजसाठी अशाच प्रकारच्या स्कॅम अलर्ट फीचरवर काम करत आहे, जेणेकरून वैयक्तिक चॅटमध्येही वापरकर्त्याला अज्ञात नंबरवरून धमकीचा सिग्नल मिळू शकेल. तथापि, हे फीचर अद्याप विकासाच्या टप्प्यात आहे.

**मोबाईल मॅनिया**

WiFi DIRECT

## इंटरनेट नसतानाही फाईल पाठवणे शक्य

आजच्या डिजिटल युगात, मोबाईलवरून मोबाईलवर फोटो, व्हिडीओ आणि कागदपत्रे शेअर करणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे; पण इंटरनेट कनेक्शन नसते, तेव्हा लोक आता फाइल्स कसे पाठवायचे याबद्दल गोंधळून जातात. इंटरनेटशिवाय फाइल्स सहज, सुरक्षित आणि जलद ट्रान्सफर करता येतात.

अँड्रॉइड कवा आयफोनमध्ये इंटरनेटशिवाय फाइल्स पाठवण्याचे उपाय

✲ **ब्लूटूथ:** यामध्ये, दोन्ही फोनचे ब्लूटूथ चालू केले जाते आणि जोडले जाते, नंतर फाइल पाठवली जाते.

✲ **वाय-फाय डायरेक्ट:** वाय-फाय डायरेक्ट तंत्रज्ञान इंटरनेटशिवायदेखील जलद फाइल पाठवण्यास अनुमती देते. दोन्ही फोनमध्ये वाय-फाय डायरेक्ट चालू करा, कनेक्ट करा आणि फाइल मॅनेजर कवा गॅलरीमधून फाइल पाठवा.

✲ **निअर शेअर:** जवळचा शेअर हा फक्त अँड्रॉइड डिव्हाइससाठी आहे. फोन सेटग्जमध्ये जाऊन ते चालू केले जाऊ शकते. एकदा सक्रिय झाल्यानंतर, फोटो, व्हिडीओ, ॲप्स आणि कागदपत्रे सहजपणे शेअर केली जाऊ शकतात.

✲ **एअरड्रॉप ॲपल:** एअरड्रॉप ही सर्वात सोपी पद्धत आहे. यामध्ये, वाय-फाय आणि ब्लूटूथ दोन्ही चालू करा, एअरड्रॉप चालू करा आणि फाइल पाठवा. आयफोनवरून आयफोनमध्ये फाइल ट्रान्सफर खूप जलद आहे.

✲ **यूएसबी ओटीजी केबल:** ओटीजी केबल असेल, तर तुम्ही एका फोनला दुसऱ्या फोनशी थेट कनेक्ट करू शकता. ही पद्धत जलद आणि मोठ्या फाइल्ससाठी योग्य आहे.

✲ **ऑफलाइन फाइल शेअरिग ॲप्स:** प्ले स्टोअरवर असे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत, जे इंटरनेटशिवाय स्थानिक हॉटस्पॉट तयार करून फाइल्स ट्रान्सफर करतात. जसे की डक-ठएळीं (जुने), दशपवशी, नरिूर इत्यादी. लक्षात ठेवा, थर्ड-पार्टी ॲप्समध्ये डेटा चोरीचा धोका असू शकतो.

# नोकरीसाठी पदवीबरोबरच कौशल्ये आवश्यक

**ग्रूमिंग**

आजच्या काळात, फक्त चांगली डिग्रीच नाही, तर काही विशिष्ट स्किल्स (कौशल्ये)असणे खूप महत्त्वाचे आहे. अनेक तरुण-तरुणी कॉलेजला न जाताही, त्यांच्या कौशल्याच्या जोरावर चांगली कमाई करत आहेत.

✲ **डिजिटल मार्केटिग:** आजच्या काळात अशी कोणतीही कंपनी नाही, जी डिजिटल मार्केटग करत नाही. त्यामुळे डिजिटल मार्केटिगची मागणी खूप जास्त आहे.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही कंपनीसाठी काम करू शकता कवा स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता.

**कमाई:** या क्षेत्रात सुरुवातीला वार्षिक ४ ते १० लाख रुपये मिळू शकतात. अनुभव वाढल्यावर ही कमाई आणखी वाढते.

**कसे शिकाल?:**

डिजिटल मार्केटग शिकण्यासाठी तुम्हाला अनेक ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध आहेत. तुम्ही इंटरनेटच्या मदतीने घरबसल्या हे कौशल्य शिकू शकता.




✲ **व्हिडिओ एडिटग:** आजच्या 'सोशल मीडिया' आणि युट्युबच्या युगात व्हिडीओ एडिटरची मागणी सर्वत्र आहे.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही संस्थेसाठी काम करू शकता कवा स्वतःचे युट्युब चॅनल सुरू करू शकता.

**कमाई:** नोकरीमध्ये सुरुवातीला वार्षिक ४ ते ७ लाख रुपये कमावता येतात.

**कसे शिकाल?:**

व्हिडिओ एडिटग शिकण्यासाठी तुम्ही ऑनलाइन कोर्सेस घेऊ शकता आणि 'व्हिडीओ एडिटग सॉफ्टवेअर'चा वापर करायला शिकू शकता.

✲ **ग्राफिक डिझायन:** आजच्या डिजिटल जगात 'ग्राफिक डिझायनर'ला मोठी मागणी आहे. कोणत्याही कंपनीला त्यांचे प्रमोशन करण्यासाठी 'ग्राफिक डिझाइनर'ची गरज लागते.

**कामाची संधी:** तुम्ही कोणत्याही कंपनीसाठी फ्रीलान्सर म्हणून काम करू शकता.

**कमाई:** सुरुवातीला वर्षाला ४ ते ७ लाख कमावता येतात.



# महाराष्ट्रातील मिनी काश्मीर

**भटकंती**

महाराष्ट्रात महाबळेश्वर, लोणावळा, खंडाळा, पाचगणी आणि इगतपुरी अशी अनेक हिल स्टेशन्स आहेत, जिथे निसर्गाच्या सुंदर सानिध्यात शांततेत वेळ घालवण्याची संधी मिळते. याशिवाय येथे ट्रेकगदेखील केले जाते; पण याशिवाय येथे एक असे ठिकाण आहे, ज्याचे सौंदर्य स्वर्गापेक्षा कमी नाही. म्हणूनच या ठिकाणाला महाराष्ट्राचे मिनी काश्मीर असेही म्हणतात. हे ठिकाण मुंबईपासून सुमारे २५० किलोमीटर लोणावळ्यापासून २१५ किलोमीटर आणि पुण्यापासून सुमारे १६० किलोमीटर अंतरावर आहे.

**तापोळा**

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील तापोळा हे एक सुंदर गाव आहे, जे दऱ्याखोऱ्यांनी आणि कोयना धरणाने वेढलेले आहे. या ठिकाणाला राज्याचा एक लपलेला खजिनादेखील मानले जाते. हे महाबळेश्वर शहरापासून सुमारे ३० किलोमीटर आणि पाचगणीपासून सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर आहे. गर्दीपासून दूर निसर्गाच्या सानिध्यात शांततेत काही वेळ घालवू इच्छिणाऱ्यांसाठी हे ठिकाण सर्वोत्तम असेल. तापोळा तलावावर तुम्ही निसर्गाच्या सुंदर दृश्याचा आनंद घेऊ शकता.

तापोळा तलाव हे एक उत्तम ट्रेकग आणि पिकनिक स्पॉट आहे. येथे तुम्हाला बोटग, कयाकग, पॅराग्लायडग आणि पोहणे अशा अनेक साहसी ॲक्टिव्हिटी करण्याची संधी मिळू शकते. याशिवाय, तुम्ही येथील ऐतिहासिक किल्लयांना भेट देऊ शकता. जयगड आणि वासोटा किल्ले तापोळा येथील घनदाट जंगलात आहेत. ट्रेकग करून येथे पोहोचता येते. अशा परिस्थितीत जर तुम्हाला ट्रेकग आवडत असेल तर तुम्ही तुमच्या मित्रांसह येथे जाऊ शकता.

शिवसागर तलाव हा घनदाट जंगलांनी आणि सर्व बाजूंनी पर्वतांनी वेढलेला आहे. स्वच्छ निळ्या पाण्याच्या या तलावाजवळ तुम्हाला अनेक प्रजातींचे पक्षी पाहता येतील. तापोळा जवळ अनेक लहान बेटे आहेत, तुम्ही तिथे सायकल भाड्याने घेऊ शकता आणि सायकलग करू शकता. यासोबतच तुम्ही आजूबाजूच्या गावांनाही एक्सप्लोर करू शकता.

**तापोळ्याला कसे पोहोचाल?**

मुंबईहून तापोळ्याला बसने जाता येते. तुम्ही तुमच्या वाहनाने थेट महाबळेश्वरला पोहोचू शकता आणि तेथून तापोळ्याला जाऊ शकता. वाटेत तुम्हाला फलक दिसतील. तापोळ्याजवळचे रेल्वे स्टेशन वाठार आहे. तापोळा तेथून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर आहे. वाठारहून बस कवा टॅक्सीने तापोळ्याला पोहोचता येते.

# धावल्यानंतर भूक का लागते?

**फिटनेस फंडा**



काही किलोमीटर धावल्यानंतर अनेकांना भूक लागते. पण धावून खर्च केलेल्या कॅलरींवर खाऊन पाणी फेरता येत नाही. म्हणूनच अतिखाणं टाळण्यासाठी या भूकेची नेमकी कारणं जाणून घ्यायला हवीत. शरीराची गरज समजून घेतली की सगळं काही सोपं होऊन जाईल.

✲ धावताना बऱ्याच कॅलरी खर्च झाल्याने शरीरातली ऊर्जा कमी होते. ऊर्जेची ही गरज भागवण्यासाठी शरीराला अन्नाची गरज लागते. म्हणून आपल्याला खूप भूक लागते.

✲ डाएट करणाऱ्यांना धावल्यानंतर खूप भूक लागू शकते. डाएट करणारे आधीच कमी कॅलरी घेत असतात. त्यातच धावल्यामुळे शरीरातल्या उरल्यासुरल्या कॅलरी खर्च होतात आणि शरीर अन्नाची मागणी करतं.

✲ धावल्यानंतर अनेकांना भूक नाही तर लहान लागते. आपल्याला भूक लागली आहे का तहान, याबाबत अनेकांचा गोंधळ उडतो. या गोंधळात काही लोक खूप खातात आणि डिहायड्रेट होतात. तसंच भूक पाण्याने मारणंही चुकीचं आहे. भूक आणि तहान यातला फरक ओळखायला शिका.

✲ अनेकांना मानसिक कारणांमुळे भूक लागते. आपण खूप धावलोय. त्यामुळे आता आपल्याला खायला हवं, असे विचार मनात आल्यामुळे प्रत्यक्षात भूक लागलेली नसतानाही खावंसं वाटतं.

✲ व्यायामाच्या प्रत्येक प्रकाराचा तुमच्या भूकेवर वेगळा परिणाम झाल्याचं पहायला मिळतं. धावणं हा तीव्र स्वरुपाचा व्यायाम आहे. यामुळे प्रचंड कॅलरी खर्च होतात आणि भूक लागते. पण प्रत्येक व्यायामप्रकाराच्या बाबतीत असं म्हणता येणार नाही. काही प्रकारच्या व्यायामांनंतर भूक मरते.

# भविष्यासाठी सर्वोत्तम करिअर

**करीअरवाटा**



भविष्यासाठी नियोजन करताना, अशा करिअरचा विचार करणे आवश्यक आहे जे वाढतील आणि स्थिरता देतील अशी अपेक्षा आहे. भविष्यासाठी काही सर्वोत्तम करिअरमध्ये **हे समाविष्ट आहे.**

✲ **डेटा सायन्स आणि ॲनालिटिक्स:** मोठ्या डेटाचे महत्त्व वाढत असताना, डेटा सायंटिस्टना जास्त मागणी आहे. हे व्यावसायिक संस्थांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी जटिल डेटाचे विलेषण आणि अर्थ लावतात.

✲ **आरोग्यसेवा:** नर्सिंग, आरोग्यसेवा प्रशासन आणि टेलिमेडिसिन यासारख्या आरोग्यसेवेतील करिअरमध्ये लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. वृद्धांची लोकसंख्या आणि वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगती ही मागणी वाढवते.

✲ **कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स:** भविष्यात 'एआय' तज्ज्ञ आणि रोबोटिक्स अभियंते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. उद्योगांमध्ये परिवर्तन घडवून आणणारे आणि कार्यक्षमता सुधारणारे तंत्रज्ञान विकसित करतील.

✲ **अक्षय ऊर्जा:** जग शाश्वत ऊर्जेकडे वळत असताना, अक्षय ऊर्जेतील करिअर अधिक महत्त्वाचे बनतील. यामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि इतर हरित तंत्रज्ञानातील भूमिकांचा समावेश आहे.

✲ **सायबर सुरक्षा:** डिजिटल धोक्यांमध्ये वाढ होत असताना, सायबर सुरक्षा व्यावसायिक आवश्यक असतील. ते सायबर हल्ल्यांपासून संस्थांचे संरक्षण करतात आणि संवेदनशील माहितीची सुरक्षा सुनिश्चित करतात.

